गुरूवार, ०५ जानेवारी २०२३

किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०२ अंक -१३८

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 05 JANUARY 2023

adhunikkesari.com Adhunik Kesari

● YEAR-02 ● ISSUE-138 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5


## चंदुलाल बियाणी यांना कै. सुधाकरराव डोईफोडे प्रेरणादायी पत्रकारिता पुरस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** मागील चौदा वर्षापासून देण्यात येणारे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून मान्यवरांच्या उपस्थितीत दि. 5 जानेवारी 2023 रोजी सायंकाळी 6 वाजता मिनी सह्याद्री रेस्ट हाऊस, नांदेड येथे प्रदान करण्यात येणार आहेत.

मीमांसा फाऊंडेशन, मिडीया-पोलीस सोशल क्लब, पत्रकार प्रेस परिषद, दै. समीक्षा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मंथन क्रिएटिव्ह ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी पत्रकार दिनानिमित्त वृत्तपत्र क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात येते. यंदाचे हे पंधरावे वर्ष आहे. यावर्षी डॉ. शंकररावजी चव्हाण पत्रकारिता पुरस्कार मागील अनेक वर्षापासून वृत्तपत्र क्षेत्रात कार्यरत मुंबईच्या प्रेरणा जंगम, कै. सुधाकरराव डोईफोडे प्रेरणादायी पत्रकारिता पुरस्कार परळी येथील दै. मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांना देवून सन्मानीत करण्यात येणार आहे.

मागील 30 वर्षापेक्षा अधिक काळापासून वृत्तपत्र क्षेत्रात कार्यरत दै. महासागरचे ज्येष्ठ संपादक एम.एम. बेंद्रीकर यांना स्व. रामेश्वर बियाणी जीवन गौरव पुरस्कार तर नायगावचे सुर्यकांत सोनखेडकर स्व. अनिल कोकीळ स्मृती पत्रकारिता पुरस्कार, डॉ. शंकररावजी चव्हाण विकास पत्रकारिता पुरस्कार (ग्रामीण) अर्धापूरचे रामराव भालेराव, समीक्षा कर्तृत्व सन्मान पुरस्कार बिलोलीचे गोविंद मुंडकर, पंचनामाकार लक्ष्मणराव गायकवाड निर्भीड पत्रकारिता पुरस्कार जय महाराष्ट्र लातुरचे सचिन अंकुलगे, मीमांसा फाऊंडेशन ह्युमन राईट्स पुरस्कार भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष शंकरराव मावलगे, स्व. अनंतराव नागापूरकर वृत्तपत्र विक्रेता पुरस्कार (शहर) प्रमोद योगी, स्व. अनंतराव नागापूरकर वृत्तपत्र विक्रेता पुरस्कार (ग्रामीण) उमरीचे गोविंद ढगे, वृत्तपत्र क्षेत्रातील जाहिरात आधारस्तंभ भोकरचे बी.आर. पांचाळ, मंथन क्रिएटिव्ह डिजीटल मिडीया पुरस्कार नमस्कार महाराष्ट्रचे संघरत्न पवार, वृत्तपत्र क्षेत्रातील सहकारी दुवा (संगणक चालक) लोकमतचे पुरूषोत्तम काशटवार, वृत्तपत्र क्षेत्रातील तिसरा डोळा (फोटोग्राफर) किनवटचे के. मूर्ती, स्व. माधव अंबुलगेकर सामाजिक पत्रकारिता पुरस्कार कंधारचे गणेश कुंटेवार, स्व. सुरेश पटणे मुद्रण सेवा पुरस्कार रमेश आवटे यांना जाहीर झाले आहेत.

तरी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मंथन क्रिएटिव्ह ग्रुपचे रामेश्वर धुमाळ, पत्रकार प्रेस परिषदेचे प्रदेश प्रभारी अरविंद जाधव, मराठवाडा अध्यक्ष सखाराम कुलकर्णी, कोषाध्यक्ष ज्ञानोबा पवार, रमेश तिवारी, सचिव सुनिल कुलकर्णी, संगीताताई बारडकर, उज्वला दर्डा, सविता गबाळे, अरूणा पुरी, मो.तनवीर, शिवहारी गाढे तथा संपादक रूपेश पाडमुख यांनी केले आहे.

# वीज संकट टळले !



## उपमुख्यमंत्री फडणवीसांची मध्यस्थी यशस्वी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महावितरण, महाजनको आणि महापारेषणमधील खासगीकरणाला विरोध करत मध्यरात्रीपासून कर्मचारी संपावर गेले होते. ३२ संघटनांच्या दीड लाख कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन तीन दिवसांचा संप पुकारला होता. आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संघटनांशी संवाद साधण्यासाठी बैठक बोलावली होती. तीनही सरकारी कंपन्यांतील अधिकृत कर्मचारी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते.**

राज्य सरकारला या तीनही कंपन्यांचे कुठलेही खासगीकरण करायचे नाही. उलट पुढच्या तीन वर्षांत या तीनही कंपन्यांमध्ये ५० हजारांची गुंतवणूक केली जाणार आहे. त्यामुळे खासगीकरण करण्याचा प्रश्नच येत नाही, अशी भूमिका उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केली.

ओडिशा, दिल्ली येथे खासगीकरण झाले आहे, तसे महाराष्ट्रात करण्याचा कोणताही विचार नसल्याचे फडणवीस म्हणाले. समांतर खासगी परवाने देण्याबद्दल अधिक बोलताना फडणवीस म्हणाले की, संमातर परवाने पद्धतीला विरोध करण्याची कर्मचाऱ्यांनी घेतली. याबद्दल कर्मचाऱ्यांची समजूत घालताना ते म्हणाले की, हे नोटीफिकेशन खासगी कंपनीने काढले आहे. जेव्हा एमआरसी यावर नोटीफिकेशन काढेल त्यात आपण सरकारची सर्व बाजू मांडू. कंपनीच्या हिताचाच निर्णय एमआरसीच्या माध्यमातून झाला पाहीजे, असे राज्य सरकारचे स्पष्ट धोरण असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. तसेच संघटना आणि सरकारची बैठक यापुर्वीच झाली असती तर गैरसमज निर्माण झालेच नसते. सरकारने मांडलेली भूमिका संघटनांना पटले आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काही प्रश्न आहेत. कालांतराने त्यावरही तोडगा काढला जाईल, असे सुतोवाच उपमुख्यमंत्री व ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

## अनिल परब यांची संपत्ती ईडीकडून जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) राज्याचे माजी मंत्री आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांच्या १०.२० कोटी रुपयांची मालमत्तेवर तात्पुरती जप्ती आणली आहे. जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेमध्ये रत्नागिरीतील ४२ गुंठे जमीन व त्यावर बांधण्यात आलेल्या साई रिसॉर्टचा समावेश असून, त्याची किमत ७ कोटी ४६ लाख ४७ हजार असल्याचे समजते.

पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालयाने अनिल दत्तात्रय परब, मेसर्स साई रिसॉर्ट, मेसर्स सी शंख रिसॉर्ट आणि इतरांविरुद्ध दापोलीतील न्यायदंडाधिकाऱ्यांकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे ईडीने आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) तपास सुरू केला आहे. पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या कलमांचे उल्लंघन झाल्याने अनिल परब आणि इतरांविरुद्ध राज्य सरकारची फसवणूक आणि नुकसान केल्याबद्दल दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ईडीने सविस्तर परिपत्रकही जाहीर केले आहे. ईडीने यासंदर्भात जाहीर केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे की, अनिल परब यांनी साई रिसॉर्टशी संबंधित परवानग्या मिळवताना स्वतःची मालक म्हणून ओळख लपवली.


MASSIA
MARATHWADA ASSOCIATION OF SMALL SCALE INDUSTRIES & AGRICULTURE

ADVANTAGE MAHARASHTRA EXPO 2023 aurangabad
Where Potential meets Opportunities

**Invitation**

"MASSIA" Cordially invites you for the Inaugural Ceremony of
"Advantage Maharashtra Expo-2023"
Exibition & Conference, From 5th to 8th January 2023, Aurangabad

**INAUGURATION CEREMONY**
5th January 2023 at 10.00 a.m

by the Auspicious hands of
**Shri. Narendra Modi ji**
Honourable Prime Minister, Govt. Of India

Chief Guest
**Shri. Eknath Shinde**
Honourable Chief Minister, Maharashtra
**Shri. Devendra Fadnavis**
Honourable Dy. Chief Minister, Maharashtra

Shri. Raosaheb Danve — Hon. Minister Of State In the Ministry Railway, Govt. of India
Dr. Bhagwat Karad — Hon. Minister Of State In the Ministry of Finance, Govt. of India
Shri. Uday Samant — Hon. Industry Minister, Govt. Of Maharashtra
Shri. Sandipan Bhumre — Hon. Guardian Minister, Aurangabad Govt. Of Maharashtra
Shri. Abdul Sattar — Hon. Agriculture Minister, Govt. Of Maharashtra
Shri. Atul Save — Hon. Minister, Co-Operation, Backward & Bahujan Vikas, Govt. Of Maharashtra

Guest of Honour
Shri. Ambadas Danve — Hon. MLC, Leader of Opposition, Maharashtra
Shri. Imtiyaz Jaleel — Hon. Member of Parliament, Aurangabad
Shri. Satish Chavan — Hon. MLC, Aurangabad
Shri. Sanjay Shirsat — Hon. MLA, Aurangabad West
Shri. Pradeep Jaiswal — Hon. MLA, Aurangabad Central
Shri. Haribhau Bagade — Hon. MLA, Phulambri, Aurangabad
Shri. Prashant Bamb — Hon. MLA, Gangapur, Aurangabad
Shri. Ramesh Bornare — Hon. MLA, Vaijapur, Aurangabad
Shri. Udaysingh Rajput — Hon. MLA, Kannad, Aurangabad

Your gracious presence is highly solicited.

RSVP
Kiran P. Jagtap — President, MASSIA
Abhay G. Hanchanal — Convener, Advantage Maharashtra EXPO 2023
Bhagwan Raut — Vice President, MASSIA
Anil Patil — Vice President, MASSIA
Rahul Mogale — Hon.Secretary, MASSIA
Rajendra Chaudhari — Hon.Secretary, MASSIA


Team MASSIA
Venue : Auric, DMIC, Shendra, Aurangabad - 431 007, Maharashtra (India)


## 'स्वराज्यरक्षक' भूमिकेवर ठाम : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** 'स्वराज्यरक्षक' छत्रपती संभाजी महाराजांच्या संदर्भात मी कोणतंही वादग्रस्त विधान केलेले नाही. 'स्वराज्यरक्षक' ही संकल्पना व्यापक, सर्वसमावेशक, छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाला ती शोभणारी आहे, त्यामुळे स्वराज्यरक्षक या भूमिकेवर मी आजही ठाम आहे. सातत्याने महापुरुषांचा अवमान करणाऱ्या राज्यपालांसह भाजपच्या वाचाळवीरांना वाचविण्यासाठी, त्यांच्या बेतालपणापासून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी भाजपकडून माझ्याविरोधात आंदोलनाचे षडयंत्र रचण्यात आल्याचा घणाघात विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आज पत्रकार परिषदेत केला. इतिहास संशोधकांनी या मुद्द्यांवर संशोधन करून वस्तुनिष्ठ पुराव्यांच्या आधारे मांडणी करावी. खरा इतिहास समोर आणावा. लोकांच्या प्रबोधनासाठी ते उपयुक्त ठरेल. परंतु राजकीय हेतूने राज्यातील वातावरण तापवणे आणि विद्वेषाचे राजकारण करणे कदापि सहन केले जाणार नाही, असे अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत ठणकावून सांगितले. स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्याबद्दल आमच्या मनात नितांत आदर आहे. त्यामुळेच महाविकास आघाडीच्या गेल्या अर्थसंकल्पात पहिल्याच पानावर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाला साजेसे स्मारक पुणे जिल्ह्यातल्या वढू बुद्रुक आणि तुळापूर येथे करण्यासाठी अडीचशे कोटी रुपयांचा निधी देण्याचे जाहीर केला. घोषणा करुन आम्ही थांबलो नाही तर, त्यासाठीची आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण केली. मी सातत्याने या स्मारकासाठी बैठका घेत होतो, कामाचा आढावा घेत होतो. छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने 'छत्रपती संभाजी महाराज शौर्य पुरस्कार' योजना आम्ही सुरु केली. मात्र, शिंदे-फडणवीस सरकारने यासंबंधी कोणत्याही हालचाली केल्या नाहीत. छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक भारतीय जनता पक्षाला मान्य नाही का ? असा सवालही अजित पवार यांनी यावेळी केला.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# आँखोंसे जो उतरी हैं दिलमें ...

आधुनिक केसरी



आणि ग्रीष्म ऋतूतलं फळ हे सर्व एकाचवेळी ( युगपद् ) ज्यात आहे, जे ( एकाच वेळी ) मनाला शांत करणारे ( संतर्पणम् ) आणि मोहितही करणारे आहे. किंवा स्वर्ग आणि पृथ्वी यांचं ऐश्वर्य जर एकाच वेळी एकत्र हवं असेल तर प्रियमित्रा, तू शाकुंतलाचा आस्वाद घे.' मला वाटतं हेच उद्गार सर्व ग्रंथांना लागू होतात . ज्ञानेश्वर माऊलींची माफी मागून त्यांच्या भाषेत मला असे सांगावेसे वाटते ग्रंथ सर्व रसांचा आगरु, ग्रंथ सर्व सुखांचा सागरु तरी ग्रंथ हाती घेईजे, मग सर्व सुखाते पात्र होईजे. जशी प्रेशर कुकरमध्ये कोंडलेली वाफ बाहेर पडणे आवश्यक असते त्याचप्रमाणे आपल्या मनात साठलेल्या भावनांचे सुद्धा मुक्त होणे, निचरा होणे किंवा ज्याला आपण विरेचन असे म्हणू तेही आवश्यकच असते. पुस्तके आणि त्यांचे वाचन अशा प्रकारचे भावनांचे विरेचन ज्याला इंग्रजीत कॅथर्सिस म्हटले जाते ते घडवून आणतात. मी वाचकही आहे आणि लेखकही. माझा तर श्वास म्हणजे वाचन ! मी जेव्हा आनंदी असतो तेव्हा एखादे आवडते पुस्तक हातात घेतो आणि माझा आनंद दुणावतो. मी जेव्हा दुःखात असतो तेव्हाही एखादे पुस्तक हातात घेतो आणि माझे दुःख उणावते. थोडक्यात म्हणजे गणपतीच्या आरतीत म्हटल्याप्रमाणे चांगल्या पुस्तकांचे वाचन हे ' सुखकर्ता दुःखहर्ता ' अशा प्रकारचे आहे. स्वानंदासाठी वाचन करावे, विचार, अनुभव आणि भावना समृद्ध होण्यासाठी वाचन करावे. ' मेरा पढने में नही लागे दिल...' याऐवजी ' मेरा पढनेमेहीं लागे दिल ' असे म्हणू या.



# आनंदी पहाट

## आनंदानुभूती घेत करावी नववर्षाची सुरुवात

आधुनिक केसरी

इंग्रीजी दिनदर्शिकेप्रमाणे नुकत्याच सुरु झालेल्या नवीन वर्षासाठी आपले नाविन्यपूर्ण संकल्प साकारण्याच्या दृष्टीने अनेकांचे नियोजन सुरु असेल. त्याच अनुषंगाने सकारात्मक विचारांची गरज असल्याचे विसरून चालणार नाही. कालचा दिवस संपला, तरच आपल्या आयुष्यातील नवीन दिवसाची पहाट उगवते. नवीन दिवसाच्या उगवत्या सूर्याच्या तेजोमय किरणांनी आपले नवे आयुष्यच जणू काही सुरु होत असते. दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचारांनी झाली तर पुढील दिवस उजाडेपर्यंत आपण आनंदी, सुखी, समाधानी तर राहू शकतोच, शिवाय मनःशांती अधिक प्राप्त होत राहते. अलीकडच्या काळात जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यातून पैशाने काहीही विकत घेता येते आणि विकताही येते. असे जरी असले तरीही मनःशांती मात्र आपल्या अंतरंगात प्रसूत व्हावी लागते. आपण वर्तमानांत आपले जीवन जगत असताना खरे तर सद्यःस्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणे महत्वाचे, गरजेचे आणि म्हणूनच आवश्यक असते. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मी असे केले होते, तसे केले होते. ह्या सर्वच घटना भूतकाळातल्या असतात, त्याचेच आपण सदोदित कौतुक करत रहात असतो. भूतकाळाचे भूतच जणू काही आपल्या मनाचा ताबा घेऊन सर्वत्र टेंभा मिरवत असते. वर्तमानातल्या मी चा त्यामुळेच आपल्याला विसर पडलेला असतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्यःस्थितीत, वर्तमानकाळात, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे? आणि ते सुद्धा का? ह्याचा प्रकर्षाने आणि प्राधान्याने, सातत्याने आणि साकल्याने अभ्यासपूर्वक विचार करत राहणे गरजेचे असते. मी कालच्या पेक्षाही आज सरस, प्रगत होणे आवश्यक आणि म्हणूनच महत्वाचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## होई लीन माथा | चरणाशी ||

नम्र भाव जेथे | नांदे तेथे हरि ||
काय अहंकारी | सुखी होतो ?||१||
गुणदोष अंगी | नांदतात खरे ||
परी त्याग सारे | दोष जीवा ||२||
क्षीर-जल दोन्ही | एकरूप झाले |
क्षीर ते प्राशिले | राजहंस ||३||
तैसे माझ्या मना | स्थिर होय वृत्ती ||
संतसंग चित्ती | रूजू द्यावा ||४||
तुझ्या कृपे हरि | सुखावलो आता ||
होई लीन माथा | चरणाशी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी




**कार्यक्षेत्र कोणतेही वाईट नाही. त्या कार्यात आपण कुशल नसणे मात्र वाईट आहे. कौशल्यासाठी निरंतर प्रयत्न करण्याने खरा आनंद मिळतो; त्याची गोडीही अवीट आहे.**

**जा कोठेही खुशाल, पण सर्वाग्रणी होण्याचे लक्ष्य प्राप्त कर. जगातील प्रत्येक जण सहकारी आहे; बघ, तुला ते सहकार्य कितपत घेता येईल.**

डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# काव्य-चरितावली

## पुष्प -८ वे



आधुनिक केसरी

**कोल्हापूरी वास्तव्यास असतांना
घडलेल्या आहेत दोन घटना
भेटलेला भिकारी काही ऐकेना
श्रीमहाराजांना काही केल्या सोडेना ।। १ ।।
महाराजांनी स्वतःच्या कानातली
भिकबाळी खसकन ती ओढली
भिकाऱ्याच्या हातावर टिकवून
रक्ताळलेल्या कानाने गेले तिथून ।। २ ।।
श्रीमहाराजांना दत्तक घेण्यासाठी
राजगुरू त्यांना घरी घेऊन आले
त्याचे विधिउपचार आरंभ केले
वामनाने रावजींना हे सांगितले ।। ३ ।।
रावजी श्रीमहाराजांस भेटले
राजगुरू उभयतांनी विनवले
उपयोग नाहीच झाला , रावजी
श्रीमहाराजासह गोंदवल्यास पोंचले ।। ४ ।।
कवी अरुणदास म्हणे-सांगेन पुढचे..**



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**मना संग हा सर्व संगास तोडी।
मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी।
मना संग हा साधका सीघ्र सोडी।
मना संग हा द्वैत निःशेष मोडी।।२०४।।**

**श्लोकार्थ :-** मना ! संताची संगत इतर संगतीपासून बाजूला करते. सत्संगाने चटकन मोक्ष मिळतो. सत्संगाने साधकाची लवकर सुटका होते. सत्संगाने द्वैत समूळ नाश पावते.

**विवेचन :-** प्रपंच आणि देह यांची उपेक्षा करून संतसंगती करावी असे समर्थांनी मागील श्लोकात सांगितले. संतसंगतीने मनुष्य सर्वसंग परित्याग करू शकतो आणि यातून काय साध्य होऊ शकते, ते या श्लोकात समर्थ आपल्याला सांगत आहेत. व्यवहारात आपण बघतोच संगतीचा परिणाम काय असतो ? "ढवळ्या शेजारी बांधला पवळ्या, वाण नाही पण गुण लागला" अशी स्थिती आपण समाजात पहात असतो. दारू प्यायला शिकवणारी शाळा कोठेही नाही, परंतु दारू पिण्यास शिकवावे लागत नाही. त्यावरची कडी म्हणजे दारू पिण्याचा परवाना मायबाप सरकारच देते आणि विरोधाभास असा की दारू बंदी नावाचे स्वतंत्र सरकारी विभाग देखील आहे. याचा परिणाम असा आहे की आज निर्व्यसनी माणूस शोधावा लागत आहे. हा सर्व संगतीचाच परिणाम नाही का ? संतसंगतीचा परिणाम मात्र या उलट आहे. परिसाच्या संगतीने लोखंडाचे सोने झाले की ते कायम सोनेच राहते. नदी सागराला जाऊन मिळाली की तिचे अस्तित्व समुद्राच्या रुपाने अबाधित राहाते. आगगाडीने प्रवास करताना तिकीट काढणारी आणि न काढणारी सर्व माणसे फक्त गाडीत बसली की ती आपल्या गंतव्य स्थानी जाऊन पोचतात. हा गाडीच्या संगतीचा परिणाम नाही का ? चोरांच्या टोळीत एखादा नवीन मनुष्य सामील झाला की तो लगेच चोर होऊन जातो, याउलट एखाद्याने गंमत म्हणून जरी भगवी वस्त्रे परिधान केली आणि साधूंच्या सोबत प्रवास करू लागला की तो लगेच साधू होऊन जातो.

"गांवीचे होते लेंडवोहळ । गंगेसी मिळतां गंगाजळ । काकविष्ठेचे झाले पिंपळ ।

संताजवळ राहिल्याने आसक्ती जरी पुरती सुटली नाही तरी नकळत कमी होत असते. म्हणून मनुष्याने नेहमी सत्समागमात राहावे. संगत आणि अभ्यास यांचा आपल्या मनावर फार परिणाम होतो. आपण हातात काठी घेतली तर उगीच कुणाला मारावेसे वाटेल; ही झाली काठीची संगत. मनुष्याने हातात माळ घेतली तर तिने तो जपच करेल, माळेने काही कुणाला मारणार नाही. आपल्या पोशाखात, वागण्यात, बोलण्यात, सर्व ठिकाणी संगत आपल्यावर परिणाम करते; म्हणून संतांच्या सहवासात राहण्याचा हट्ट असावा. संतसंगतीने मनातील किंतु, पण, आणि परंतु दूर होण्यास मदत होत असते. त्यामुळे साधकाची प्रगती होण्यास खूपच मदत होते. संतांची देहाने संगत लाभणे दुर्लभ आहे पण मनुष्य नामानुसंधानात राहिला तर नित्य सत्ससंगच असतो. "न लगे मुक्ति धन संपदा | संत संग देई सदा ||" असे तुकाराम महाराज का म्हणाले असतील ? याला एकच कारण आहे ते म्हणजे देहबुद्धिचा संपूर्ण नाश होण्यास संतसंगती हा सुलभ मार्ग आहे. दुसऱ्याच्या अत्तर लावताना त्याचा किंचितसा सुगंध आपल्या हाताला लागत असतो. सर्व संत सांगतात त्याप्रमाणे अध्यात्माची पहिली पायरी आहे सत्संग आणि सत्संगाची शेवटची पायरी आहे भगवंताची प्राप्ती. द्वैत आणि अद्वैताच्या पलीकडे, सगुण आणि निर्गुणाचाच्या पलिकडे, संग आणि निःस्संगाच्या पलीकडे भगवंत आहे, असे सर्व संत सांगतात.

संत सोयरा बाई म्हणतात,
"अवघा रंग एक झाला । रंगि रंगला श्रीरंग ॥१॥ मी तूंपण गेले वायां । पाहतां पंढरीच्या राया ॥२॥ नाही भेदाचें तें काम । पळोनि गेले क्रोध काम ॥३॥ देही असुनि तूं विदेही । सदा समाधिस्त पाही ॥४॥ पाहते पाहणें गेले दुरी । म्हणे चोखीयाची महारी ॥५॥"

'अचपळ' मनापासून मनुष्याने सुरु केलेला प्रवास सद्‌गुरुंवर पूर्ण विश्वास ठेवून तसेच अनथक प्रयत्नाने केल्यास सुस्थिर मनापर्यंत न थांबता वृत्तीची निवृत्ती होण्या इतपत होऊ शकतो, हे समर्थांनी अनेक गोष्टी सांगून पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. थोड्या वेगळ्या पद्धतीने बोलले तर 'मी देह आहे' ही जाणीव उराशी घट्ट धरून मनुष्याने सुरु केलेला प्रवास 'विदेही' होऊन परमात्मप्राप्तीपर्यंत होऊ शकतो, हे सुद्धा समर्थांनी सांगितले आहे.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# कल्पना म्हणजे काय?

आधुनिक केसरी


चांगली वाईट असे दोन कल्पनेचे प्रकार आहेत. कल्पना जीवन व्यापून टाकते. 1)चांगली कल्पना--ईश्वरावर श्रद्धा, निर्भयता, चांगलेपणाची भावना, आशावादी पणा,यशाची खात्री या सगळ्या चांगल्या कल्पना आहेत. चांगल्या कल्पना आत्मबुध्दी पोसतात व मन मोठे विशाल करतात. ज्यांना संत बनायचे आहे किंवा ज्यांची जन्मतःच बुद्धी सात्विक आहे. जे कधीही आपपर भाव ठेवत नाहीत कधीही दुसऱ्याचें वाईट चिंतत नाहीत सतत परोपकार प्रत्येक जीवाला सुख लाभूदे असा निजचैतन्याचा ध्यास घेणारे पारमार्थिक लोक यासाठी पात्र ठरतात. यासाठी संत ज्ञानेश्वरांनी पसायदान लिहिले. की जी विश्वाला सुखी ठेवण्याची प्रार्थना केली आहे. संत तुकाराम,नामदेव,गोरा कुंभार ,सावतामाळी, चोखोबा,जनाई मुक्ताई,शेगावीचा राणा श्री गजानन महाराज, अक्कलकोट चे श्री स्वामी समर्थ महाराज &आपण आता ज्यांचे अध्ययन करत आहोत ते स्वामी समर्थ रामदास महाराज या सर्वानी हेच सांगितले आहे की कल्पना मायेचे निवारण करते,कल्पना ब्रम्हाला थारा देते. त्याची स्थापना करते . म्हणून सतत सन्मार्गाची कास धरा. मनामध्ये वाईट विचारांना थारा देऊ नका. यासाठी संत साहित्य अभ्यासा,तिर्थाटन करा. वाईट कल्पना चिंताभय,हिनपणाची भावना,पुढे काय होती ल याची सतत चिंता,आळशीपणाची नोराज्ये, खलनायक विचार सरणीं सतत दुसऱ्या वर कुरघोडी करणे त्याचा अपमान करणे सदैव दुसऱ्या ला कमी लेखणे. मी पणा अहंभाव, मत्सरी स्वभाव, निंदानालस्ती करणे हीसर्व वाईट कल्पनेची ठिकाणे आहेत. अशा ठिकाणी कुणीही जास्तवेळ थांबू नये. तुमच्या जीवाला याठिकाणी धोका होऊ शकतो.

**-सौ. उज्ज्वला धर्माधिकारी, पुणे**

## आज पंतप्रधान मोदी करणार 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो' चे ऑनलाईन उद्‌घाटन

- मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती
- ऑरिक सिटीत ५ ते ८ दरम्यान औद्योगिक प्रदर्शन
- उद्योग विभाग, मसिआचे संयुक्त आयोजन
- राज्यातील सर्वात मोठे औद्योगिक प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** राज्यातील सर्वात मोठे औद्योगिक प्रदर्शन 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो २०२३' चे गुरूवार, ५ जानेवारी २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑनलाईन पद्धतीने उद्‌घाटन करतील. याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती राहेल. ४ दिवस चालणाऱ्या प्रदर्शनातून मराठवाड्यातील उद्योगाची क्षमता जगासमोर मांडण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. चार दिवसात १००० कोटीच्या उलाढालीचा अंदाज आहे. मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरच्या (मसिआ) वतीने दर तीन वर्षानी 'ॲडव्हांटेज महाराष्ट्र एक्स्पो' चे आयोजित केले जाते. यंदा मसिआसोबत महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग, एमआयडीसी आणि ऑरीक सिटीच्या संयुक्त विद्यमाने हे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनाचे व्हिडीओ कॉन्फरेन्सिंगद्वारे उद्‌घाटन गुरूवारी, ५ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी करतील. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रिय राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, रावसाहेब दानवे, खासदार इम्तीयाज जलील, राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत, कॅबीनेट मंत्री अतुल सावे, संदीपान भुमरे, अब्दुल सत्तार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार हरिभाऊ बागडे, संजय शिरसाट, प्रदीप जैस्वाल, सतीश चव्हाण, प्रशांत बंब, रमेश बोरणारे, उदयसिंह राजपूत आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार असल्याची माहिती मसिआचे अध्यक्ष किरण जगताप, कन्व्हेनर अभय हंचनाळ, उपाध्यक्ष भगवान राऊत, अनिल पाटील, सचिव राहुल मोगले, राजेंद्र चौधरी, मुख्य प्रसिद्धी प्रमुख अब्दुल शेख, प्रसिद्धी प्रमुख दुष्यंत आठवले, ज्वाईंट पीआरओ रवी आहेर यांनी दिली. ३० एकरांवरील प्रदर्शनात ४ दिवसात ६५० स्टॉल्स आणि २२ चर्चासत्रांच्या माध्यमातून मराठवाड्यातील उद्योगांची क्षमता जगासमोर दाखविली जाईल. चार दिवसात १ लाखाहून अधिक अभ्यागत भेटी देतील. २०२० च्या महाएक्स्पोत ४५० ते ५०० कोटीची उलाढाल झाली होती. यंदा ती १ हजार कोटीचा पल्ला गाठेल, असा विश्वास अध्यक्ष जगताप यांनी व्यक्त केला. प्रदर्शनात रेल्वे विभाग, सिमेन्स, इंडयूरन्स, एंडर्स हाऊजर, रॉयल एनफील्ड, भारत फोर्ज, जेसीबी, आनंद ग्रुप, बजाज ऑटो लि., इंडयूरन्स, व्हेरॉक, संजीव ऑटो सारख्या कंपन्या सहभागी होतील. कंपन्यांचे पर्चेस व मटेरियल अधिकारी भेटी देतील.

# श्रीक्षेत्र राजूर येथून मनोरुग्णांसाठी २३ क्विंटल धान्य केले सुपूर्द

## नववर्षाचा सेवा संकल्प : प्रा.बाळासाहेब बोराडे



आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** नुकतीच सन २०२३ या नवीन वर्षाला सुरुवात झाली. या वर्षात काय करायचे याची संकल्पना प्रत्येकाच्या मनात असते.म्हणून नववर्षाचे स्वागत आपण नवसंकल्पनेतून करत असतो. समाजिक भान ठेवत राजुर व परिसरातील काही सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, शेतकरी, व्यापारी व महिला यांच्या माध्यमातून नवीन वर्षाच्या प्रारंभी पळसखेड सपकाळ येथील सेवा संकल्प या मनोरुग्णाच्या आश्रमास २३ क्विंटल गव्हाचे संकलन करून प्रकल्पाचे संचालक डॉ. नंदकिशोर पालवे यांच्याकडे सुपूर्द केले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील व चिखली तालुक्यातील पळसखेड सपकाळ येथे सेवा संकल्प नावाने मनोरुग्ण आश्रम चालू आहे .प्रकल्पाचे संचालक नंदकिशोर पालवे आणि त्यांच्या पत्नी सौ. पालवे हे दाम्पत्य जेष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांची प्रेरणा घेऊन मनोरुग्णांची सेवा करतात.या प्रकल्पात १९०पेक्षा जास्त मनोरुग्न आहेत.ज्यांना रक्ताच्या नात्याने नाकारलं,ज्यांना लोकांनी आयुष्यात धोका दिला ,जे रस्त्यावर उघडे-नागडे फिरतात आणि ज्यांच्या पायामध्ये आळ्या पडलेल्या आहेत अशा सर्व रुग्णांचा पालवे दाम्पत्याने आपल्या मुलाप्रमाणे सांभाळ केला आहे.

राजूर परिसरातील अनेक सामाजिक कार्यकर्ते या आश्रमाशी जोडले गेले आहेत या सामाजिक कार्यात आपलाही खारीचा वाटा असावा म्हणून राजूर परिसरातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी सेवा संकल्प प्रकल्पातील अनाथ,निराधार लोकांना मदत करण्याचे ठरविले.त्यातूनच प्रत्येकाने दहा किलो धान्य जमा करण्याची संकल्पना सुचली.यामध्ये १६९पेक्षा जास्त लोकांनी सहभाग घेऊन २३क्विंटल गव्हाचे संकलन केले आहे.

ठरल्याप्रमाणे नवीन वर्षाच्या प्रारंभी राजुरेश्वराच्या पायथ्याशी श्री खडेश्वरी बाबा यांच्या हस्ते नारळ फोडून २३ क्विंटल गव्हाच्या धान्याच्या गाडीची पूजा करून पळसखेड सपकाळ येथीलआश्रमाकडे पाठवण्यात आले. सेवा संकल्प आश्रमातील निराधार, बेघर व ज्यांना रक्ताच्या नात्यातील लोकांनी सोडून दिले आशा मनोरुग्णांसाठी निस्वार्थी भावनेतून व सर्वांच्या प्रयत्नातून आपण २३ क्विंटल धान्याची मदत गरजूपर्यंत पोहचवून नवीन वर्षाची सुरवात सेवा कार्यातून करू शकलो याचे समाधान सर्वांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते. सेवा संकल्प प्रकल्पास धान्यस्वरूपात मदत केली म्हणून डॉ.नंदकिशोर पालवे यांनी सर्व सामाजिक कार्यकर्त्यांचे आभार मानले.



# चि. कैवल्य डोळे यास शिष्यवृत्ती प्राप्त

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि. कैवल्य संजय डोळे या विद्यार्थ्याने घवघवीत यश प्राप्त करून शिष्यवृत्ती धारक बनला आहे. त्याच्या या यशाबद्दल संस्था प्रशासकीय अधिकारी मा चंद्रकांतजी मुळे, केंद्रिय कार्यकारिणी सदस्य तथा विद्यासभा उपाध्यक्ष मा उमेशजी जगताप, मुख्याध्यापक श्री विजेंद्र चौधरी यांच्या हस्ते विद्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी पर्यवेक्षक श्री दत्तात्रय तांबारे, विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे, शिष्यवृत्ती प्रमुख सौ सोनाली निर्मळ, पालक सौ. माधवी डोळे तथा शिक्षक सहकारी उपस्थित होते. कैवल्यच्या यशाबद्दल भाशिप्र संस्थेचे अध्यक्ष मा डॉ.सुरेंद्रजी आलुरकर, कार्यवाह मा डॉ हेमंतजी वैद्य, कोषाध्यक्ष मा सत्यनारायणजी लोहिया, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष मा गजाननराव जगताप, कार्यवाह मा डॉ विवेकजी पालवनकर, शालेय समिती अध्यक्ष मा प्रमोदजी कुलकर्णी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

# परीक्षा केंद्रात बदल झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट

## सेंटरवर जाण्यासाठी बसेसची व्यवस्था नाही

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** चिश्तिया महाविद्यालय खुलताबाद अभ्यास केंद्र ( केंद्र क २११११९ ) येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राचे परीक्षा केंद्र (एम.ए./ बी.ए.) ग्रामीण भागात मागील वर्षी सुरु झालेले अभ्यासकेंद्र स्थलांतरित करण्यात आले आहे.

येथील परीक्षा केंद्र भाऊराव पाटील आर्ट, सायन्स कॉलेज (२१२६४) सुलतानपूर, तालुका खुलताबाद या अभ्यासकेंद्रास देण्यात आले. या अभ्यासकेंद्राला खुलताबाद शहरातील कोहिनूर महाविद्यालय (२१२३४) चिश्तिया महाविद्यालय (२१११९) या दोन्ही अभ्यासकेंद्रातील परीक्षार्थीसाठी 15 किलोमीटर दूर अंतरावरील या महाविद्यालयातील अभ्यासकेंद्रास स्थलांतरित केले. हे महाविद्यालय विनाअनुदानित तत्त्वावर तीन वर्षापूर्वी सुरू झाले. तसेच य. च. म. मु. विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र मागील एक वर्षापूर्वी सुरू करण्यात आले. महाविद्यालयात पुरेसा मान्यताप्राप्त कर्मचारी व सहाय्यक प्राध्यापक नाहीत. या सेंटरवर जाण्यासाठी बसेसची व्यवस्था नाही. महाविद्यालयात परीक्षा केंद्रासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. यासंदर्भात औरंगाबाद विभागीय केंद्राचे संचालक डॉ. रमेश शेकोकार यांना या सर्व गैरसोई लक्षात आणून दिल्या. परंतु त्यांनी याची दखल घेतली नाही. तरी संचालकांच्या या निर्णय संदर्भात तर्क वितर्क लावण्यात येत आहेत.

# सशक्त समाज संघटन होणे काळाची गरज : माजी आ. गोविंद अण्णा केंद्रे

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** वंजारी सेवा संघ महाराष्ट्र या राज्यातील प्रमुख सामाजिक संघटनेच्या दशकपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने राज्यस्तरीय पदाधिकारी मेळावा स्व वी दा सावरकर नाट्यगृह रत्नागिरी येथे उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्रात वंजारी समाजाची ओळख ही संघर्षशील व स्वाभिमानी जमात म्हणून आहे. या समाजाचा इतिहास फार मोठा असल्याचा दिसून येतो या समाजाच्या हाती त्या काळात लेखणी नसल्यामुळे लिखित स्वरूपात इतिहास उपलब्ध होत नाही. मध्ययुगीन काळात हा समाज महाराष्ट्रात येऊन स्थिर झाला. दऱ्या खोऱ्यात वस्ती करून राहू लागला. अत्यंत संघर्षातून स्वतःचे जीवनमान उंचावण्याचे काम या समाजाने केले आहे. त्यांना मार्गदर्शन करण्याची कार्य या समाजातील संत आवजीनाथ बाबा, संत वामन भाऊ, राष्ट्रसंत भगवान बाबा क्रांतिवीर वसंतराव नाईक यांनी केली. तर या समाजाला देशपातळीवर ओळख निर्माण करून देण्याचे कार्य लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी केले. आज समाजातील गुणवंत विद्यार्थी खुल्या प्रवर्गातून आपली गुणवत्ता सिद्ध करत आहेत गुणवत्ता स्वाभिमान व संघर्ष हीच समाजाची ओळख आहे अत्यंत थोडक्या आरक्षणामुळे समाजाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. समाजाच्या विविध स्वरूपाच्या समस्या सोडविण्यासाठी एका सशक्त समाज संघटनेची गरज होती आणि ही गरज वंजारी सेवा संघाच्या माध्यमातून पूर्ण होत आहे असे गौरवउद्‌गार वंजारी सेवा संघाच्या दशकपूर्ती सोहळ्यात राज्यस्तरीय समाज मेकावाव्यात अध्यक्षस्थानावरून बोलताना मा. माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे यांनी काढले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून केंद्र शासनाच्या नीती आयोगाचे सदस्य व भटक्या विमुक्त समाजाचे अभ्यासक मा.श्री दादा इदाते हे उपस्थित होते. त्यांनी मार्गदर्शन करताना त्यांनी गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या सोबतच्या अनेक आठवणींना उजाळा दिला व भारतीय जनता पार्टीतील पुरोगामी



चेहरा व बहुजनाची ओळख गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या माध्यमातून होत असे सांगितले. शिवाय या समाजाला मोठ्या व भरीव आरक्षणाची गरज आहे. अपुऱ्या आरक्षणामुळे समाजातील तरुणांना फार मोठ्या बेकारीला तोंड द्यावे लागत आहे याची खंत व्यक्त केली.

माजी आमदार डॉ नारायणराव मुंडे साहेब यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्रातून उपस्थित असलेल्या समुदायाला मार्गदर्शन केले. त्यांनी समाजाच्या संघटना बरोबरच ओबीसीचे संघटन होणे ही काळाची गरज आहे. राजकारणामध्ये दबाव गट तयार करण्यासाठी सर्व ओबीसींना एकत्र येऊन कार्य करावे लागेल आणि सत्ताकेंद्रे ताब्यात घ्यावे लागतील अन्यथा एकट्या जातीय संघटना कुचकामी ठरतील असे प्रखर विचार व्यक्त केले.

यावेळी माजी आमदार तोताराम कायंदे साहेब यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सामाजिक संघटन करत असताना आपले राजकीय नेतृत्व विसरून चालणार नाही. नेतृत्वाला बळ देण्याचे काम वंजारी सेवा संघाने करावे असे विचार मांडले. ओबीसी परिषदेचे राज्य समन्वयक श्री अरुण खरमाटे यांनी वंजारी सेवा संघाच्या कार्याचे कौतुक करत गेल्या 4 ते 5 वर्षात समाजाचे संघटन सुयोग्य सुरू असून आत्ता या चळवळीला समजातील राजकीय नेत्यांनी आपले आशीर्वाद व पाठबळ देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले.

सकाळच्या सत्रात संघटनात्मक बैठक पार पडली. यानंतर प्रदेश कार्याध्यक्ष देवेंद्र बारगजे यांनी मुख्य कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले त्यामध्ये वंजारी सेवा संघाच्या 10 वर्षाच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकला.

# भाजपात बदलाचे संकेत

आधुनिक केसरी

भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक १६ व १७ जानेवारी रोजी होत असून यात पक्षाध्यक्षपदी जे. पी. नड्डा यांना मुदतवाढ दिली जाण्याची शक्यता आहे. मात्र बैठकीच्या निमित्ताने पक्षात अनेक मोठे संघटनात्मक बदल केले जाण्याची शक्यता असून केंद्रीय मंत्रिमंडळातही फेरबदल होतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची पूर्वतयारी आधीपासून सुरू झाली असून विरोधकांच्या ताब्यात असलेल्या देशभरातील १६० लोकसभा मतदारसंघांवर भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. नड्डा आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे दोघेही झंझावाती दौरे करत आहेत. नड्डा यांची पक्षाध्यक्षपदाची मुदत २० जानेवारी रोजी संपत असली तरी कार्यकारिणी बैठकीत मुदतवाढीवर शिक्कामोर्तब केले जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. मात्र काही केंद्रीय मंत्र्यांना संघटनात्मक जबाबदारी दिली जाणार असल्याची चर्चा असल्यामुळे कार्यकारिणी बैठकीत राष्ट्रीय महासचिव, राष्ट्रीय सचिव आणि प्रभारींमध्ये बदल केले जाणार असल्याचे समजते. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी म्हणजे १५ ते ३० जानेवारी या काळात पक्ष संघटना आणि केंद्रीय मंत्रिमंडळात हे बदल केले जाऊ शकतात. लोकसभा निवडणुकीपूर्वी होणारे हे अखेरचे फेरबदल असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अत्यंत विश्वासू सी. आर. पाटील यांना केंद्रित मंत्रिमंडळाऐवजी संघटनेत सक्रिय केले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गुजरातमधील मनसुख मंडाविया, पुरुषोत्तम रुपाला आणि दर्शना जरदोश हे तीन मंत्री मंत्रिमंडळात असल्याने पाटील यांना राष्ट्रीय स्तरावर संघटनेमध्ये स्थान दिले जाऊ शकते व त्यांना महत्त्वाच्या राज्यांचे प्रभारीही केले जाऊ शकते, असे भाजपच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी २०२३ मध्ये कर्नाटक, मध्य प्रदेश आणि राजस्थान या तीन महत्त्वाच्या राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळाच्या फेरबदलामध्ये जातीच्या समीकरणांकडे अधिक लक्ष दिले जाऊ शकते. बिहारमध्ये नितीशकुमार यांच्या जनता दलाने (सं) भाजपचा हात सोडला आहे. येत्या काही दिवसांत केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची शक्यता असून काही विद्यमान मंत्र्यांना डच्चू दिला जाऊ शकतो. केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, निर्मला सीतारामन, धर्मेंद्र प्रधान, मनसुख मंडाविया, भूपेंद्र यादव आदींचा अपवाद वगळता इतरांचे 'प्रगतिपुस्तक' तपासले जात आहे. त्यामुळे मोदी सरकारमधील बहुतांश मंत्र्यांवर टांगती तलवार आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिंदे गटाला केंद्रात सामावून घेतले जाण्याची शक्यता आहे.



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

# संभाजी राजे आम्हाला माफ करा !

आधुनिक केसरी

**राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या स्वप्नाला मूर्त रूप येताना तुम्ही लहानाचे मोठे झाला . पितृप्रेमाची सावली आणि ऊब तुम्हाला खूप कमी लाभली. आग्रा येथून परत येत असताना तर तुम्ही येई पर्यंत माँ. जिजाऊंना घोर लागून राहिला होता. पण या सर्व प्रक्रियेत धर्माबद्दलची ज्वाजवल्य ज्योत तुमच्या हृदयात अधिक द्दढ होत गेली. तुम्ही केवळ युद्ध शास्त्र पारंगत झाला नाही तर तुम्ही धार्मिक ग्रंथाचा अभ्यास करून त्यात ही विद्वान ठरला ! महाराजांनी विस्तारित केलेल्या स्वराज्याचे रक्षण करणे आणि ते विस्तारणें अशी दुहेरी जबाबदारी महाराज गेल्यावर तुमच्यावर होती . मुघल सल्तनत दक्षिणेकडे विस्तार करू पाहत होती पण तुम्ही त्यात अडथळा होता !**

इकडे गोवा आणि अन्य किनारपट्टीवर इंग्रज आणि पोर्तुगीज यांच्या माध्यमातून ख्रिस्त धर्माचे आक्रमण परतवून लावण्याची जबाबदारी तुमच्यावर होती !

आपले शौर्य पणाला लावून आपण लढत असताना घात झाला आणि आपण औरंगजेबाचे कैदी बनले . आग्र्याचा अनुभव लक्षात घेता त्या पाताळयंत्री औरंगजेबाला कुठलाही धोका पत्करायचा नव्हता . त्याच्या आदेशानुसार जाड जुड साखळदंडांनी तुमची ती भरदार शरीरयष्टी जखडली गेली . तुम्हाला त्या मुघल बादशहाने मुस्लिम धर्म स्वीकारण्याचा पर्याय दिला ! मराठ्यांशी लढण्यापेक्षा सगळी राजवट एका झटक्यात मुस्लिम करण्याचा तो सोपा मार्ग होता . औरंगजेब सूड उगवू पाहत होता !

तुम्ही शिवाजी राजेंचे चिरंजीव ! जिजाबाई यांचे नातू !तुम्ही हे कसे स्वीकारणार ? तुमचा नकार त्या दुष्ट ,धर्मांध औरंगजेबाला अपेक्षित होताच पण सुडाने पेटलेल्या त्या धर्मांध औरंगजेबाने तुमचा छळ सुरू केला . पेटत्या भाल्याने तुमचे डोळे काढले , कातडी सोलून काढली , हात ,पाय एक एक अवयव काढले जात होते आणि तुम्ही प्रत्येक क्षणी आठवत होता भगवत गीतेतील अमर श्लोक ' नैनम् छिन्दन्ति शस्त्राणि.....आणि धर्मासाठी , मातृभूमीला शरीर अर्पण करत होतात . अखेर त्या क्रूरकरम्याने तुमच्या शरीराचे तुकडे करून ते फेकून दिले पण त्यावेळी असणाऱ्या समाजभक्तांनी ते शिवून त्यांच्या राजाचे म्हणजे तुमचे अंत्यसंस्कार केले ! खऱ्या अर्थाने तुम्ही धर्मवीर ठरले ! शरीराच्या खुणा संपल्या पण तुमचा पवित्र आत्मा तुमच्या धर्मासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण करून देत होता , प्रेरणा देत होता !



तुमच्या बलिदानातून हिंदू समाज पेटून उठला . छत्रपती राजाराम महाराज यांच्या नेतृत्वाखाली मराठी फौज एकत्र आली ! संताजी, धनाजी यांनी औरंगजेबाला सळो की पळो करून सोडले ! औरंगजेबाच्या छावणी चे कळस कापून आणून त्याची पूर्ण नाचक्की केली गेली !

राजे तुम्ही हे सगळे बघत होता आणि तुमच्या एक एक जखमेची परत फेड केली जात होती ! औरंगजेब मारला गेला आणि त्याचे कलेवर घेऊन त्याच्या सैनिकांना 100 किलो मीटर पळावे लागले .

थेट सदाशिव भाऊ यांनी दिल्लीचे तख्त फोडे पर्यंत मराठ्यांनी मागे वळून पाहिले नाही . बाळाजी विश्वनाथ , बाजीराव , राघोबा आणि शिंदे होळकर यांनी उत्तरेत पुन्हा मुघलांना डोके वर काढू दिले नाही अगदी अटकेपार भगव्या झेंड्याला फडकवले . त्यामागे महाराजांची प्रेरणा होती तसे तुमचे धर्मासाठी झालेले बलिदान यातून पेटलेली मराठी / हिंदू मने हे पण कारण होते . राजे म्हणून तुम्ही आमच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने कायमच धर्मवीर आहात पण चार चौघात ते कबुल करण्यात आमचा स्वार्थ आडवा येतो म्हणून आम्हाला माफ करा !

पण राजे , तुम्ही ज्या धर्मासाठी बलिदान दिले ,स्वतःचे हाल हाल करून घेतले त्याच धर्मात काही कपूत असे जन्माला आले ज्यांनी तुमच्या नावाचा उपयोग करत हिंदू समाजात फूट पाडणारी एक विद्रोही संघटना स्थापन केली. त्या संघटनेचे बोलावते धनी काल चक्क बरळून गेले ' संभाजी राजे धर्मवीर नव्हते तर म्हणे स्वराज्य रक्षक होते ' !

संभाजी राजे तुम्ही जर आज अवतरले तर आम्हाला खात्री आहे तुम्ही या टोळ भैरवाना नक्की प्रश्न विचाराल अरे स्वराज्य म्हणजे कुणाचे राज्य ? राजे हे 'स्व ' कशाला म्हणतात हेच विसरून गेले आहेत हो ! राजे तुम्ही स्वराज्याच्या रक्षणासाठी धर्मवीर बनले पण या लबाड कोल्हे आणि लांडग्यांनी मुद्दाम समाज भ्रमित करण्यासाठी तुमच्या बलिदानाचे अवमूल्यन केले ! तुम्ही आम्हाला माफ करा !

राजे , ज्या औरंगजेबाने तुमचे हाल हाल केले त्याचे थडगे ज्यांनी महाराष्ट्रात दिमाखाने उभे होऊ दिले , अफजलखान याचे उरूस भरवण्यात ज्यांनी धन्यता मांडली आणि राजे , तुमच्या आणि महाराजांच्या सैन्यात किती मुस्लिम सरदार होते हे मोजण्यात आयुष्य घालवले ते राजे तुम्हाला धर्मवीर कसे मानतील ? त्यांना मतांच्या राजकारणाची चटक लागली आहे . या आधुनिक लोकशाहीत मते मिळवण्यासाठी इतिहासाची मोडतोड करून सत्य हे असत्य आणि असत्य हे सत्य करण्यासाठी धडपडणारे अमोल इतिहासकार आणि श्रीमंत यांचे बोल या महाराष्ट्राला ऐकावे लागत आहेत पण राजे हे सगळे ऐकून तप्त सळ्या आणि भाले यांनी जेव्हढ्या वेदना झाल्या नाही तेव्हढ्या वेदना तुम्हाला होत असतील याची कल्पना असूनही आम्ही हे सहन करत आहोत या बद्दल आम्हाला माफ करा !

आम्ही महाराष्ट्रातील कपाळ करंटी माणसे ! आमच्या मातीत अनेक महापुरुषांना नियतीने जन्माला घातले ! आम्ही त्यांच्या विचारांचा , कार्याचा वारसा जपण्या ऐवजी आमच्या राजकारणाच्या क्षुद्र स्वार्थासाठी , आमची खानदानी दौलत वाढवण्यासाठी त्यांना जाती जातीत कोंडले आहे ! त्या साठी राजे आम्ही खोटे इतिहास लिहले ! महाराष्ट्रातील मराठी माणसाला जातीत विभागून तुम्ही राजे ज्यांच्या बरोबर संघर्ष केला त्यांना मांडीवर घेऊन आम्ही सत्तेचे मलिदे खुशाल वाटत आणि लाटत आहोत ! राजे त्यामुळे तुमचे विचार आणि तुमचे बलिदान आम्हाला कसे समजणार ? राजे आम्हाला माफ करा ! राजे , तुम्हाला सांगतो , आम्ही धर्मवीर म्हणणाऱ्यांना एक नाव दिले आहे मनूवादी ! एकदा हे नाव दिले की त्या विरोधात आम्हाला सगळ्या मंडळींना एकत्र आणता येते ! ज्या जिहादी प्रवृत्ती विरोधात तुम्ही संघर्ष केला त्यांच्याबरोबर निर्लज्ज पणे जाण्यासाठी राजे त्यांना तुम्हाला धर्मवीर म्हणणे अवघड आहे आणि घराणेशाही चा अनुनय करत राजकीय स्वार्थ साधण्यासाठी आम्हाला त्यांना विरोध करणे अवघड आहे म्हणून राजे आम्हाला माफ करा !

तुमचा वारसा पुढे नेण्यात आम्ही नालायक ठरत आहोत ! आमच्या आया बहिणी ना त्या जिहादी वृत्तीपासून वाचवण्यात आम्ही अपयशी ठरत आहोत ! गायीची हत्या होत असताना आम्हाला कुठलेच दुःख नाही ! ज्या प्रेषितांच्या दूताला राजे तुम्ही मुंबई ते गोमंतक फक्त व्यापाराच्या मर्यादेत ठेवले त्याचे सण साजरे करण्यात आम्ही मश्गुल आहोत ! मग आम्ही तुम्हाला कसे धर्मवीर म्हणणार ? राजे आम्हाला माफ करा ! जमल्यास आमचा हा माफीनामा छत्रपती शिवरायांना पण वाचून दाखवा ! इतिहासाची मोडतोड आणि त्यातून विकृत विचाराचे निर्माण हा आमचा अधिकार आहे असे समजा आणि आम्हाला उदार अंतकरणाने माफ करा !

कराल ना माफ ?

ता .क . : सोबत तुम्ही लिहलेले एक पत्र इतिहास संशोधक जयसिंग पवार संपादित पुस्तकात आम्हाला सापडले ! ते तुमचे नाही याची आम्हाला खात्री आहे . ते नक्की मनुवाद्यांचे कारस्थान आहे ! आणि जरी तुम्ही ते तुमचे आहे असे म्हंटले तरी आम्ही ते ऐकणार नाही कारण ते ऐकणे आमच्या राजकीय सोयीचे नाही . त्यासाठी पण आम्हाला माफ करावे ही विनंती.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# नेपाळमध्ये चीनधार्जिणे सरकार

आधुनिक केसरी

**नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश असून भारताच्या मित्र देशांपैकी एक देश आहे. भारत आणि नेपाळची संस्कृतीही जवळपास सारखीच आहे. जगातील एकमेव हिंदू देश अशी नेपाळची ओळख आहे. स्वातंत्र्यापासून नेपाळशी आपले सौहार्दाचे संबंध आहेत. साडेचार कोटी लोकसंख्या असलेल्या आणि हिमालयाच्या कुशीत वसलेल्या या निसर्गसंपन्न देशाची भारताची मैत्री जगजाहीर होती.**

भारत आणि नेपाळ मैत्रीचे संबंध इतके जवळचे होते की नेपाळची सीमा देखील आपण मुक्त केली आहे म्हणजे नेपाळमधील कोणताही नागरिक व्हिसा शिवाय भारतात प्रवेश करू शकतो तसेच भारतात व्यवसायही करू शकतो. नेपाळचे लाखो नागरिक आज भारतात वास्तव करून आहेत. दोन्ही देशात रोटी बेटीचा व्यवहार देखील होतात. असे असले तरी गेल्या काही वर्षात नेपाळ आणि भारतात कटुता निर्माण झाली आहे. ही कटुता भविष्यात आणखी वाढण्याची शक्यता आहे कारण नेपाळमध्ये सत्तेत आलेले नवे सरकार हे भारत विरोधी असून चीन धार्जिनी असलेली व्यक्ती नेपाळच्या पंतप्रधानपदी विराजमान झाली आहे. कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळचे ( सिपीएन ) प्रमुख आणि माजी पंतप्रधान पुष्पकुमार दहल प्रचंड हे पुन्हा नेपाळचे पंतप्रधान होणार आहेत. नेपाळमध्ये नुकतीच लोकसभेची निवडणूक पार पडली मात्र या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला पूर्ण बहुमत न मिळाल्याने प्रचंड व माजी पंतप्रधान के पी शर्मा ओली यांनी युती करून सरकार स्थापनेचा दावा केला. प्रचंड व ओली शर्मा या दोन्ही नेत्यांत झालेल्या करारानुसार प्रचंड पहिले अडीच वर्ष नेपाळचे पंतप्रधान असतील तर के पी ओली शर्मा हे नंतरचे अडीच वर्ष पंतप्रधान राहतील. याचाच अर्थ पुढील पाच वर्ष हेच दोन नेते नेपाळचे पंतप्रधान राहतील आणि त्याचमुळे भारताची डोकेदुखी वाढली आहे कारण हे दोन्ही नेते भारत विरोधी असून चीन धार्जिणे आहेत. याआधी जेंव्हा जेंव्हा हे दोघे पंतप्रधानपदी विराजमान झाले त्या त्या वेळी त्यांनी कायम भारताच्या कुरापती काढून भारताला त्रास देण्याचेच काम केले. अर्थात हे सर्व त्यांनी चीनच्याच सांगण्यावरून केले हे उघड आहे. भारताच्या शेजारी असलेल्या देशांना साम, दाम, दंड, भेद या मार्गाचा वापर करून भारताविरुद्ध फितवायचे आणि स्वतःकडे वळवायचे असे चीनचे धोरण आहे. या धोरणाला बळी पडून प्रचंड आणि ओली या दोघांनी भारताला आव्हान दिले होते. त्यामुळे दोन्ही देशात कटुता निर्माण झाली होती. ओली शर्मा पंतप्रधान असताना त्यांनी अनेकदा भारत विरोधी वक्तव्य केली होती. प्रचंड हे ही भारतावर अनेकदा टीका करतात आणि नक्षलवादाचे समर्थन करतात. मागे ते पंतप्रधान असताना त्यांनी भारताचा काही भाग नेपाळच्या नकाशात दाखवला होता त्यामुळे दोन्ही देशात मोठा तणाव निर्माण झाला होता आता ही ते तीच भूमिका घेऊ शकतात. चीन त्यांना असे करण्यास बाध्य करू शकतो. मागील काही वर्षात चीनने नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. चीन नेपाळच्या सीमेवर रस्ते आणि लोहमार्ग बांधत आहे. इतकेच नाही तर भारताच्या सीमेवर असलेल्या गावांत चीनने बांधकाम केले आहे. नेपाळ लष्कराने काठमांडू - ताराई - मधेश दृदगती मार्ग बांधण्यासाठी चीनच्याच कंपनीला काम दिले आहे. आता प्रचंड पंतप्रधान बनल्यानंतर चीन नेपाळमध्ये आणखी बस्तान बसवणार त्यामुळे भारताची चिंता वाढणार आहे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सीमा प्रश्नाचे मूळ 'सत्ता' कारण ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**नागपूरचे हिवाळी अधिवेशन महाराष्ट्र व कर्नाटक सीमाप्रश्नावर गदारोळ, आरोप- प्रत्यारोपाने गाजले.सीमा प्रश्न ६७ वर्षात सुटलेला नाही. मग याचवेळी या विषयावर राजकीय वादळ का उठले? या राजकीय नेते कुरघोडीचा खेळ खेळत आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्र व कर्नाटक दोन्ही राज्यात भाजपाची सत्ता आहे.कर्नाटकमधील भाजपाचे नेते वाद उकरून काढत आहेत?यामागे कर्नाटक भाजपाचे राजकारण दडलेले आहे. कारण कर्नाटक विधानसभेची २०२३ मध्ये निवडणूक होणार आहे. त्यामुळे तेथील भाजपाचे नेते कन्नडी व मराठी भाषेचा भावनिक वाद निर्माण करत आहेत.दुसरीकडे महाराष्ट्रात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते या विषयावरून राज्य सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत होती.पण सरकारचे दोन नेते 'शेरास सव्वाशेर' निघाले आहेत.हे सरकार कर्नाटक सरकारच्या विरोधात ठराव करणार नाही,असे विरोधी पक्षाला वाटत होते,पण झाले उलटे!या सरकारने कर्नाटक सरकारच्या विरोधात ठराव केला. त्यामुळे महाविकास आघाडीतील नेत्यांचा डाव धुळीला मिळाला.**

संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती चळवळीतून झालेली आहे. या चळवळीत सेनापती बापट, डॉ.आंबेडकर, एस. एम. जोशी, आचार्य अत्रे, श्रीपाद डांगे, शाहीर अमर शेख,भाई उध्दवराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे ही मोठी मंडळी होती. त्यामुळे चळवळीला बळ मिळाले. यात १०८ जणांनी बलिदान दिले. काँग्रेस सरकारने तर मराठी माणसांच्या छातीवर गोळ्या झाडल्या. मुंबई महाराष्ट्राला देण्यास काँग्रेसचा विरोध होताच. मुंबईसाठी महाराष्ट्राला कोट्यवधीचा मोबदला द्यावा लागला. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत काँग्रेसचे योगदान मुळीच नाही. उलट काँग्रेसने मराठी भाषिक विदर्भाचा भाग हा तोडण्याचे कारस्थान रचले होते. पण त्यात यश आले नाही. ईस्ट इंडिया कंपनीचे १६८७ मध्ये बॉम्बे प्रेसिडेंसी कार्यालय बनले. बॉम्बे प्रांतात कराची, पुणे अहमदाबाद, बेळगाव, असे चार विभाग होते. यात गुजरात विभागात अहमदाबाद, खेडा, भरूच, पंचमहल, सुरत, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, कर्नाटक विभागातील बेळगाव, विजापूर, धारवाड, उत्तर कनडा भाग होता.बॉम्बे प्रांताचे १९३७ ते १९४७ पर्यत बाळासाहेब खैर पहिले मुख्यमंत्री होते. देशाच्या विभाजनानंतर सिंधचा भाग पाक मध्ये गेला. काँग्रेस पक्षाच्या १९३२ च्या अधिवेशनात महात्मा गांधींनी भाषावार प्रातांचा मांडलेला प्रस्ताव पक्षाने मंजूर केला होता.पण या प्रश्नावर काँग्रेसने सारड्याप्रमाणे भूमिका बदलली आहे. १९३५ मध्ये बॉम्बे प्रातांच्या निवडणूका घेण्यात आल्या. १९३६ मध्ये सिंध,आसाम, बिहार, ओरिसा या प्रांताची रचना करण्यात आली होती.१९४६ मध्ये मराठी साहित्य संमेलनात साहित्यिक गो.त्र्य. माडखोलकर यांनी संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडला होता. देशात प्रांताच्या निवडणुका घेण्यात आल्या. यात मुंबईत प्रांतची निवडणुक झाली व १९४७ मध्ये बॉम्बे स्टेट हे मोठे राज्य अस्तित्वात आले. तेंव्हा बाळासाहेब खैर हे १९३७ ते १९४७ नंतर १९५२ मध्ये मोरारजी देसाई मुख्यमंत्री झाले.बॉम्बे ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने गुजराती नेते हे शहर देण्याच्या विरोधात होते. 'तर भाकप भाषावार प्रांत रचनेचा आग्रही होता. १९५२ ला मोरारजी देसाई हे मुख्यमंत्री झाले १९५३ मध्ये काँग्रेस त्रिराज्याची सूचना मांडली होती या प्रस्तावाला विरोध झाला. २९ डिसेंबर १९५६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती एस. फाजलअली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्ररचना आयोग स्थापन केला. या आयोगाने बॉम्बे शहर महाराष्ट्राला जोडू नये,व स्वंतत्र विदर्भ राज्याची शिफारस केली होती.भाषावार प्रांतरचनेला पं.नेहरू व पटेल यांचा विरोध होता. डॉ.आंबेडकर यांनी १९३२ मध्ये भाषिक राज्यामुळे वाद वाढतील,असे म्हंटले होते,ते आज खरे ठरत आहे. काँग्रेसच्या हट्टवादी भूमिकेमुळे ते संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सहभागी झाले. काँग्रेस नेते मोरारजी देसाई व स.का. पाटील यांनी 'काँग्रेस जीवंत असेपर्यंत बॉम्बे मिळणार नाही' असे विधान केले. त्यामुळे आंदोलनाचा भडका उडाला होता.तेंव्हा पोलिसांनी केलेल्या गोळीबारात विद्यार्थी नंदकुमार गोखले उर्फ बंडू गोखले हा ठार झाला. तर मारूती बेल्लाळकर हा तरूण 'तुमच्या गोळ्या आमच्या छातीवर घाला' असे म्हणाला अन् पोलिसांनी त्याच्या छातीवर गोळी झाडून ठार मारले. तेंव्हा आंदोलनातील शहीदांची संख्या १०५ होती. मुख्यमंत्री शिंदे यांनी विधानपरिषदेत हीच संख्या सांगितली आहे. वास्तविक शासनाच्या दफ्तरी आता या आंदोलनात १०८ जण शहीद झाल्याची नोंद आहे.तरीही मुख्यमंत्री शिंदे यांनी १०५ जण शहीद झाल्याची माहिती कशी काय दिली? राज्य सरकारला या आंदोलनात किती शहीद झाले, हे माहित नाही काय? शहीद झालेल्यात सर्व धर्माचे, महिला व कापड कामगार अधिक आहेत. मराठी भाषिकांच्या प्रश्नांवरुन केंद्रात अर्थमंत्री सी.डी. देशमुख यांनी मात्र राजीनामा दिला. त्यानंतर या प्रश्नावर महाराष्ट्रातील एकाही नेत्यांना सत्तेचा त्याग केलेला नाही. महाराष्ट्राला त्यावेळी बॉम्बे' देण्यास काँग्रेस व गुजराती नेत्यांचा विरोध केला.त्यावेळी वाटाघाटी करण्यात करण्यात आल्या. तसेच लोकनायक डॉ.माधव अणे व विदर्भ काँग्रेसचे अध्यक्ष बृजलाल बियाणी यांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी केली होती. अकोला करार मोडीत काढून १९५३ मध्ये नागपूर करार करण्यात आला.विदर्भ अटीसह तर मराठवाडा विनाअट संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला. राज्याच्या नेतृत्वाने राज्याचा समतोल विकास केला जाईल व दोन्ही विभागांना न्याय देण्याचे वचन दिले होते नंतर ते का पाळले गेले नाही? त्यामुळे घटनेच्या ३७१ (२) वापर करून१९९४ मध्ये वैधानिक मंडळ स्थापन करण्याची दुर्देवाने वेळ आली.याचे पश्चिम नेत्यांना स्मरण आहे काय? पूर्वाश्रमीचे भाजपाचे नाना पटोले यांनी २०१६ स्वंतत्र विदर्भ २०१९ मध्ये अशोक नेते स्वतत्र विदर्भ राज्याचे खाजगी विधेयक संसदेत मांडले होते. आजही कर्नाटक व तेलंगणा सीमेलगत असलेल्या गावांच्या विकासाकडे दुर्लक्षच आहे.ही वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्राने नवीन गुजरातला नवीन राजधानी उभारणीसाठी १० कोटी रूपये व महसूल तूट भरून काढण्यासाठी प्रतिवर्षी ४ कोटी प्रमाणे ४० कोटी देण्यात ठरले व दिले गेले.महाराष्ट्रात १९९५ ला शिवसेना -भाजपा सरकारने आले व बॉम्बेचे मुंबई असे नामांतर केले.महाराष्ट्र निर्मितीत शिवसेनेचे योगदान आहे,हे नाकारता येणार नाही.कारण




महाजन आयोगाच्या अहवालानंतर १९६९ मध्ये स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे नेतृत्वाखाली शिवसेनेने मुबंईत आंदोलन केले.यात ६७ शिवसैनिकांनी प्राणाची आहुती दिली.उध्दव ठाकरे शिवसेना मात्र महाराष्ट्र विरोधी असलेल्या विचाराच्या पक्षाबरोबर सत्तेसाठी मांडीला मांडी लावून बसत आहेत. ठाकरे सेनेने गटाने आता नीतीमुल्य सोडले आहे.आता मुबंई केंद्रशासित करण्याची भाषा इतिहास जमा झाली आहे. केंद्र व कर्नाटक व गुजरात सरकार मुंबईला तोडण्याची कधीच हिंमत करणार नाही. कारण मुबंई महाराष्ट्राची आहे ती कोणाच्या बापाची नाही, हे खरे आहे. त्यावेळी भाषावार प्रांत रचनेचा विचार न करता कारवार,बेळगाव, बिदर, बेळगावसह ८६५ गावे कर्नाटक राज्याला (म्हैसूर)जोडण्यात आले. यात १९६७ मध्ये महाजन आयोगाने बेळगाव कर्नाटक देण्याचा निर्णय दिला. राज्य पुनर्ररचना आयोगाने खेड्याऐवजी जिल्हा घटक धरला. आयोगाच्या या सूत्राला अपवाद आहे.बेल्लारीच्या मोबदल्यात बेळगाव, कर्नाटक दिले व आंध्रप्रदेशात गेलेले बेल्लोरी पुन्हा दिले.गेले १९६० विभागीय मंडळ सदस्यांनी १९५१ जनगणनेचा आधारधरुन ८१४ गावाची मागणी केली,यात १) खेडे हा घटक नव्हे जिल्हा, २) भौगलिक सलगता,३) मराठी व कन्नड भाषिकांची साक्षेप बहुसंख्या४) लोकेच्छा या चार विषयाचा प्रस्ताव मांडलेला होता.त्यास वाटाण्याच्या अक्षदा लावल्या गेल्या.आज बेळगाव,निपाणी या सीमा भागात ५४ टक्के मराठी,४६ टक्के कन्नडी भाषिक आहेत.त्यात १९०९ पासून बेळगावचे सर्वच आमदार, ३७ नगराध्यक्ष,व महापौर हे मराठी आहेत.तरीही कर्नाटक सरकार मराठी भाषिकांच्या मागणीला दाद देत नाही. कन्नड भाषेची सक्ती करते आहे. त्या भागाच्या विकासाकडे दुर्लक्ष करत आहे. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील ४० हून अधिक गावांनी २०१२ पाणी प्रश्नावरुन कर्नाटकात जाण्याचा ठराव केला होता. त्याच कर्नाटक नेते आधार घेवून बोलत आहेत. यावरुन दोन्ही राज्यात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येवू शकते. दोन्ही राज्यात मराठी व कन्नडी भाषिक सामान्य कुटुंबे राहतात, त्याच्या असुरक्षतेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. यात कर्नाटकच्या एका मंत्र्याने तर पुन्हा आगीत तेल ओतले. त्यांनी 'मुबंई केंद्रशासित करावी', अशी मागणी केली. त्याचे पडसाद महाराष्ट्रात उमटले! मुंबई महाराष्ट्राची,नाही कोणाच्या बापाची' अशा शब्दात राज्य सरकारने व विरोधी पक्षांनी एकजूटीने उत्तर दिले. हे राजकीय उत्तर ते योग्यच! खरे तर! पण काँग्रेस सरकारचे या अपयशाचे खापर शिंदे व फडणवीस सरकारवर का फोडले जात आहे? विधानसभेत मुख्यमंत्री शिंदे यांनी सीमावादाचा इतिहास सांगावयाचा नाही,ती वस्तुस्थिती लपवायची, अशी सरकारने तडजोड करून राजकीय ठराव केला का? यासाठी विरोधी पक्षाने शिंदे फडणवीस सरकारवर दबाब आणला, असे दिसते आहे. सरकारने जर वस्तुस्थिती मांडली गेली असती तर काँग्रेसचे पितळ उघडे पडले असते. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्याची बैठक घेतली व संयमाचा सल्ला दिला होता पण कर्नाटक भाजपा नेत्यांच्या कुरापती चालू आहेत! त्यानंतर कर्नाटक सरकारने एक इंच जमीन महाराष्ट्राला देणार नाही,असा ठराव केला. तर महाराष्ट्राने सीमा भागातील जमीन महाराष्ट्राची आहे,अशा शब्दात उत्तर दिले. हे केंद्रिय गृहमंत्र्यांच्या मध्यस्थीनंतर दोन्ही बाजूने घडलेले आहे. दोन्ही राज्यांनी एकमेकाचा निषेधाचा ठराव केला. यातून काय निष्पन्न झाले?सीमावाद हा दोन्ही राज्यांचा अस्मितेचा प्रश्न झालेला आहे. हा वाद २००४ पासून सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. तरी पण पुरोगामी महाराष्ट्रातील नेत्यांनी "जश्यास तसे' उत्तर दिले पाहिजे,अशी मागणी केली. राज्य सरकार व सर्व पक्षाने निषेध नोंदविला. पण यातून सीमाप्रश्न सुटणार आहे काय? ही महाराष्ट्राची परंपरा नाही अथवा सुस्कृंतपणाचे लक्षण नाही. तेंव्हा राजकीय नेत्यांनी फाजलअली आयोग व महाजन आयोग यातील त्रुटीचा अभ्यास करून एकजूटीने न्यायालयात महाराष्ट्राची बाजू मांडण्याचे प्रयत्न केला पाहिजे. या प्रश्नावर निव्वळ नेते वायफळ बडबड करत आहेत. हे देशाच्या एकात्मतेच्यादृष्टीने घातक आहे. याचा नेत्यांना विसर पडतोय!यात राज्याची निर्मिती व सीमा बदल करणे हा संसदेचा अधिकार आहे. यात केंद्रात महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात भाजपाचे व समविचाराचे सरकारे आहेत.तेव्हा सीमाबाबतचा प्रश्न चर्चेतून सुटूही शकतो, अन्यथा दोन्ही राज्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची प्रतीक्षा करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

# माझ्या ओळखीच्या सावित्रीबाई



अंजली औतकार
पोखरी, जि. बुलडाणा

आधुनिक केसरी

**मी पाहिलीला असताना सावित्रीबाईंशी ओळख झाली. अगदी तशीच जशी आपल्या भारतातल्या प्रत्येक छोट्या मुली सोबत होते, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई म्हणजे भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका. स्त्रियांना शिक्षणाची बंदी असताना ज्योतिबांनी सावित्रीबाईंना शिकवायला सुरू केलं ,अगदी समाजाच्या विरोधात जाऊन, दोघांनी मिळून समाजात स्त्रियांना योग्य स्थान मिळावं म्हणून शिक्षणाचे धडे द्यायला सुरू केले .**

त्यांच्या याच प्रयत्नातून मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा उघडण्यात आली. ज्योतिबा गेल्यानंतरही समाजाचे आरोप प्रत्यारोप सहन करत, दगड शेण अंगावर झेलूनही सावित्रीबाईंनी हा वारसा जपला.

आज स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळतंय सन्मानाने जगायला मिळतंय ती सावित्रीबाईंचीच पुण्याई. पण मग मी पहिलीला असताना मला मिळालेली सावित्रीबाई बद्दलची ही माहिती मी इथपर्यंतच ठेवली का ? का यात कधी काही वाढ झालीच नाही ? हो तर झाली,हळूहळू मोठा होताना कळलं सावित्रीबाई फुले यांच स्त्रीला शिक्षित करणे इतकच ध्येय नव्हतं, तर सावित्रीबाईंना एक मोठी कर्तुत्वाची लढाई जिंकायची होती.

तळागाळातून आलेल्या स्त्रियांना त्यांच्यासाठी चूल आणि मूल याव्यरिक्त आयुष्य संपून जायचं, तिथे स्त्रियांना ताठ मानेने जगणं शिकवायचं होतं. हे करणं इतकंही सोपं नव्हतं समाजातला उच्च मानला जाणारा वर्ग तर याच्या विरोधात होताच, पण स्त्रिया स्वतःही या बदलाला स्वीकार करायला तयार नव्हत्या, त्यांच्या मनात आत्मसन्मान जागृत करणे, ही सावित्रीबाईंची खरी लढाई होती. वाढत्या बुद्धी बरोबर सावित्रीबाईंचे व्यक्तित्व नव्या रूपाने समजत गेलं. एका स्त्रीसाठी जिच्याकडे पर्याय आहे की आपल्या पतीसोबत एक सामान्य आयुष्य जगून सुखी संसार करायचा. तरीसुद्धा त्या प्रकाशाच्या या नव्या वाटेवर पतीच्या साथीने पुढे जातात स्वतःच्या सुखांना बाजूला ठेवून समाजहितासाठी कार्य करतात. आणि हेच खरे आहे की महापुरुषांना



आभूषणाची गरज नसते त्यांचे कर्तृत्व त्यांना जगासमोर अशा पद्धतीने उभं करते की , त्यांचं असणं जगासाठी एक प्रेरणा बनून जातं. हळूहळू कळत गेलं सावित्रीबाई फक्त एक छोटस बालभारती पुस्तक नाही तर एक अजरामर कादंबरी आहे जी फक्त आजच्याच नाही पुढे येणाऱ्या युगायुगांतील स्त्रियांना मार्गदर्शक ठरेल ! पण मग सावित्रीबाई नुसत्या इतिहासाच्या पानांमध्ये गुरफटून पडलेली एक नारीशक्ती आहे का ? तर नाही आजही जेव्हा समाजात कुठल्याही वाईट कृत्या घडवून येतो तेव्हा आवाज बुलंद करून लढण्यासाठी समोर येणारी प्रत्येक स्त्री म्हणजे सावित्रीबाई आहेत. समाजातल्या त्याच वेडावलेल्या मानसिकतेला मागे सारून ध्येयाने शिकणारी प्रत्येक मुलगी सावित्रीबाई आहे. सो कॉल्ड सुशिक्षित पण पांढरपेशी समाजात स्वतःचे स्थान मिळवण्यासाठी धडपडत असणारी प्रत्येक स्त्री म्हणजे सावित्रीबाई आहे. कधी नवदुर्गांमध्ये सावित्रीबाई आहे, तर कधी नुसत्या हवे सारख्या डोक्यातून वाहत जाणाऱ्या आत्मविश्वासाची लहर आहेत सावित्रीबाई. माझ्यासारख्या तरुणाईला सावित्रीबाईंमध्ये एक सखी ,सावित्री एक बहीण सावित्री, एक सहकर्मी सावित्री दिसू लागते. आणि फक्त इतका असूनही भागत नाही अजून अशा सावित्रीबाईंची गरज आहे कारण वेळ बदलला असला, काळ बदलला असला तरी मानसिकता अजून पूर्णपणे बदलली नाही ! आजही स्त्री समाजातला एक खालच्या टप्प्यातील घटक समजले जाते ,आजही स्त्रियांसोबत समस्या आहेत आणि जोपर्यंत समस्या आहेत तोपर्यंत समाधान रुपी सावित्रीची गरज पडणारच. पण ही गरज भागवण्यासाठी सावित्रीबाई सारखी एखादी स्त्री नेहमी खंबीरपणे उभी असावी हा प्रयत्न आपण करायला हवा. महापुरुषांना आदरांजली म्हणून त्यांच्या जयंती सोहळे साजरे करणे यापेक्षा कितीतरी पट प्रभावी असू शकत, त्यांच्या विचारांना आत्मसात करणे आणि त्यांनी दाखवलेल्या रस्त्याने पुढे पुढे जाणे.

माझ्यासारख्या छोट्या मुलीला कपाळी आडव्या रेषेत कुंकू थाटलेली साध्या वर्षातील सावित्रीबाई जगातली सर्वात सुंदर आणि सर्वात शक्तिशाली स्त्री आहे ,जी नेहमी जगण्यासाठी नवी उमेद देत असते. तर या अग्नी दिव्य विचारांच्या गंगोत्री असणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना माझा मानाचा मुजरा.

# मधुमेहींसाठी आसन व योग्य आहार

आधुनिक केसरी

एकाच दिवसात खूप फिरणे व्यायाम करणे लाभा ऐवजी हानी पोहोचू शकते. यासाठी क्रमाक्रमाने व्यायाम वाढवत न्यावा फिरण्याचे अंतर वाढवत न्यावं जे व्यायाम करू शकत नाही त्यांनी प्रथम उत्तम पादासन करावे. नंतर हळूहळू हलास, पश्चिमोत्तासन, भुजंगासन, धनुरासन, सर्वांगासन, गरुडासन, मयूरासन इत्यादी असणे करावीत. या आसनामुळे शरीराची पाचनक्रिया एवढी वाढते की साखरच नाही तर कुठल्याही पदार्थासह पचला जातो. शर्करायुक्त आहार शक्यतो कमी प्रमाणात सेवन करावा. आईस्क्रीम, मिठाई, श्रीखंड, उसाचा रस तसेच चिकू, द्राक्षे, केळी, गोड, आंबे, खजूर ही फळे खाणे टाळावी. याऐवजी आंबट फळे उदाहरण संत्री, मोसंबी, जांभूळ, आंबट द्राक्षे, डाळिंब, नासपती, अलुबुखार, पेरू, पपई, ही फळे खावीत. दिवसातून किमान दोन वेळा लिंबू पाणी प्यावे. लिंबाचा रस रक्त ते साखर बाहेर टाकण्याची काम करतो. जसा साबण कपड्यातील मळ बाहेर टाकतो. पालेभाज्यांचा वापर अतिशय लाभदायक आहे. त्यामुळे आहारात साखरेचा प्रवेश कमी होतो. त्यामुळे पचन संस्थेवर सांड पडत नाही पचन संस्थेला आराम मिळतो व ती पुन्हा वेगाने कार्यरत होते. आहारात मुख्यतः दुधी कोहळा, पडवळ, वांगी, तोंडली, कोबी, फ्लावर, कारले, भेंडी, काकडी, मुळा, टोमॅटो, मटार, पालक, चना, कोथिंबीर इत्यादींचा समस्या असावा कांदा मुळात टोमॅटो गाजर कोबी पालक कोथिंबीर हे शिजवून खाण्यापेक्षा कच्ची सॅलडचे रूपाने किंवा रस काढून खाणी अधिक चांगली पचनाला स्वरूप आणि सत्व ही पूर्ण मिळतात दही सलाड जीवनात नेहमी असावी त्या दही असेल तर फारच उत्तम दुधाला पूर्ण अन्न म्हटले जाते परंतु दुधाची दह्यात रूपांतर झाले की त्याची उपयुक्तता अधिक वाढते त्यातील शर्करा समाप्त होते त्यामुळे मधुमेंसाठी हे फार उपयोगी ठरते दुधाने पोटात गॅस होतात पण दह्याने होत नाहीत दही आतड्यांना शितलता देती दही पचायला जड जात असेल तर ताक पिन ही सर्वाधिक फायदेशीर पोटाच्या विकारासाठी ताक हा रामबाण उपाय आहे फुफ्फुसाच्या आजारा व्यतिरिक्त सर्वच आजारावर ताक उपयुक्त आहे तेल तुपापेक्षा पचायला लोणी अधिक चांगली त्याला पेक्षा ऑलिव्ह ऑइल पचायला चांगली शिवाय ती क्षार प्रधान असून अमलता वाढवत नाही काजू बदाम आकुर्डी सुकामेवा खाऊ नये सिग्न पदार्थांची गरज भागवता येते.

# ग्रामीण शिक्षण आणि वास्तव



सौ. मनीषा बैनाडे-महेर
परसोडा, ता. वैजापूर

आधुनिक केसरी

**ग्रामीण भाग म्हटले की अख्या जगाला एका लहानशा खिडकीतून बघणे होय. पण ही खिडकी कधीच पूर्ण विश्व एका दृष्टीक्षेपात पाहू शकत नाही. कारण तिचे वलय लहान असल्याने हे डोळे दूरवर पाहू शकत नाही. तसे बघितले तर खेडीच देशाचा पाया आहे, परंतु जसा घराचा पाया भक्कम नसेल तर इमारत तेवढी बलाढ्य आणि उंच असू शकत नाही, त्याप्रमाणे खेडी जोपर्यंत पूर्णपणे सक्षम आणि सुदृढ होत नाही तोपर्यंत देश तरी कसा पूर्णपणे बलाढ्य आणि विकसित होईल.**

सध्याची परिस्थिती थोड्या प्रमाणात बदललेली दिसत असली तरीही आजच्या परिस्थितीत असंख्य अडचणींना ग्रामीण भागातील लोकांना तोंड द्यावे लागते आणि त्यातलाच अविभाज्य घटक म्हणजे शिक्षण, अविभाज्य म्हणण्यापेक्षा मानवाचा आत्माच शिक्षण आहे. अगोदरच्या काळापासूनच ग्रामीण भागात शिक्षणाची फड फड बघायला मिळते जी आजही जिवंत आहे. खर म्हटलं तर मोठ मोठे अधिकारी जिल्हा परिषद शाळांमधून पुढे नावारूपाला आले पण अगदी बोटावर मोजण्याइतके बाकीच्यांचे आयुष्य पूर्णपणे हरवले आहे. आजही ह्या एकविसाव्या शतकात सुद्धा अख्खे जग अगदी मोकळा श्वास घेत आहे. पण माझा ग्रामीण भाग, तेथील शिक्षण, शेतकरी आणि माझा तरूण आजही गुदमरत जीवन जगत आहे. प्रत्येक ठिकाणी त्याला संघर्ष करावा लागत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे फक्त शिक्षण आणि शिक्षणच. शिक्षण तर सर्व घेतात पण तरीही जीवन जगण्यासाठी तेवढं पुरे नाही. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इंग्लिशमुळे तर माझ्या ग्रामीण भागातील तरुण कुठे तरी खचून जातो. माझा ग्रामीण तरुण इतका सक्षम आणि परिपूर्ण बुद्धिमान आहे. जिथे जाईल तिथे पाणी काढेल असा ग्रामीण भागातील तरुणाचा इतिहास आहे. पण या दुसऱ्या शेजारच्या देशातील भाषेणे आपले महत्व इतके वाढवले आहे की आपल्या मातृभाषेचे भानच कुणाला राहिले नाही. प्रत्येक क्षेत्रात इंग्रजीलाच मोठा मान दिला जातो. आमच्या मनात या भाषेचे भयंकर भय निर्माण झाले आहे. ज्या वेळेला प्राथमिक शिक्षण घेतले जाते तेव्हाच या सगळया गोष्टी पूर्णपणे शिकवल्या जायला हव्यात. पण ग्रामीण शिक्षणामागे अनेक विघ्न आगोदरपासून आजपर्यंत कायम आहेत. जिथे शिक्षक आहेत तिथे भौतिक सुविधा नाही, जिथे या सर्व सुविधा आहे तिथे मनुष्यबळ कमी पडते, जिथे शिक्षण आणि शाळा दोन्ही आहे तिथे पालकांमध्ये उदासीनता आहे. आणि जिथे सर्व आहे तिथे सर्वात मोठी समस्या, ग्रामीण भागातील प्रचंड मोठी समस्या म्हणजे रस्ते. आजही अनेक खेड्यांमध्ये पावसाळ्यात शाळेत विद्यार्थी जाऊ शकत नाही. गुढघ्याएवढ्या चिखलातून जर उद्याची पिढी शाळेत जात असेल तर कसा आपला देश पूर्णपणे विकसित होईल. देशाचे भरण पोषण करणारे तर खेडेच आहे. हे फक्त म्हणण्यासाठी आणि जेव्हा यांच्या विकासाचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा कामाचा दर्जा कुठे जातो. प्रत्येक अन्न धान्यात मग मिरचीपासून ते गव्हापर्यंत आपल्याला सगळ्या गोष्टी दर्जेदार हव्या आणि ते उगवणाऱ्या माझ्या शेतकरी बांधवांना दर्जेदार शिक्षण, दर्जेदार रस्ते, दर्जेदार बाजारपेठ, दर्जेदार वागणूक का नको?



जगाचा पोशिंदा का झाडाला दोरी लावून लटक्तांना दिसतो. या सर्वांचे कारण फक्त आणि फक्त शिक्षण आहे. मी बघितलाय माझ्या ग्रामीण भागातील तरुण तरुणींमधला आत्मविश्वास कुठे आणि कसा डगमगत आहे. प्रत्येक ठिकाणी ग्रामीण भागातील प्रत्येक जीवाला का संघर्ष करावा लागतो? प्रत्येक ठिकाणी का आमचीच आहुती दिली जाते? ग्रामीण भागामुळेच तर देश सुजलांम सुफलाम आहे, पण ग्रामीण भागाला प्रत्यक्षात खूप वेदना सहन कराव्या लागतात. आजही अनेक खेड्यांमध्ये शिक्षणाविषयी उदासीनता दिसून येते, जिथे शिक्षण दिले जाते ते शेवटपर्यंत साथ देत नाही, मुलांना सक्षम हे शाळेच्या माध्यमातूनच बनवता येऊ शकते, पण ते साध्य होत नाही हे चित्र तरुणांच्या आत्महतेतून सिद्ध होत आहे. ग्रामीण भागातील तरुणांना योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने अनेक निर्णय चुकतात आणि खूप कष्ट करून शेवटी अपयश हाती येते. हीच माझ्या ग्रामीण भागाची व्यथा आहे. शिक्षणानेच तर एक व्यक्ती, एक परिवार, एक गाव, शहर, राज्य आणि मग देश विकसित आणि सक्षम होऊ शकतो. मग का माझ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अपूरे फक्त नावापुरते, जीवगेणे शिक्षण दिले जाते, जे जगुही देत नाही आणि मरुही देत नाही. का मध्येच हा आयुष्याचा साखळ दंड झुलत आहे? का? जिवंत असूनही ही शिक्षण व्यवस्था रोज तरुणांना तीळ तीळ मारत आहे. का माझ्या ग्रामीण भागात काही ठिकाणी शिक्षणाचा बाजार मांडला जातो? फक्त नावाला डीग्री पण नुसते काळं पान सांभाळत आयुष्य जगावं लागतं. कुणाकडे न्याय मागावा तरुणांनी कुटुंबाकडे, की शिक्षकाकडे? आजूबाजूच्या परिसरातील समस्यांकडे की शासनाकडे? कुठे भीक मागावी कोणते दार ठोकावे जिथे पोट भरण्याइतका मोबदला मिळेल? कुठे जावे माझ्या ग्रामीण तरुणाने या दलदलीत कुठेतरी देशाचे भविष्य देखील या तरुणांसारखे हताश आणि हतबल होत आहे. शिक्षण हा मोठा गंभीर प्रश्न देशासमोर उभा आहे. जो नेहमी एकच प्रश्न विचारत आहे मला तुकड्यांमध्ये नका वाटू मला समान करा, मला समान करा. आजचे तरुण न्याय मागतात त्यांना न्याय ग्रामीण भागातील शिक्षणाला शासन न्याय देऊ शकेल का? हा प्रश्न नेहमीच माझ्यासमोर प्रत्येक ग्रामीण तरूणासमोर उभा आहे.

# आयुष्य म्हणजे नात्यांची मिसळ

आधुनिक केसरी

आई वडील मूग मटकी
कडधान्य
त्यांच्या शिवाय मिसळ ही
कल्पनाच अमान्य
त्यांच्या मुळेच तर ती
बनते सकस अन्न

बहीण भाऊ टोमॅटो बटाटे
वाटाणे
मिसळतील एकमेकात
सहजपणे
मिळून येईल मिसळ
मग छान दाटपणे

नातेवाईक म्हणजे
मीठ लिंबू मसाला
चव हवी मस्त तर
प्रमाणातच घाला
खारट आंबट मिसळ
उगाच हवी कशाला

मित्र मैत्रिणी म्हणजे
लाल मस्त तर्री
मिसळीला रसदार
तीच करते खरी
हवीहवीशी चटकदार
चव आणते भारी

जोडीदार, कांदा
डोळ्यात आणे पाणी
पण मिसळीला मजाही
तोच तर आणी
फोडणीत हवाच शिवाय
वरून त्याची पेरणी

मुलं ,कुरकुरीत शेव
फरसाण चिवडा
त्यांच्यावीना मिसळ
हा विचारच सोडा
अधुरा राहील ना सारा
खटाटोप एवढा

शेजारी, म्हणजे कोथिंबीर
हिरवी गार
असेल तर
मिसळीची वाढेल शोभा
पार
नसली तरी काही
अडणार नाही फार


ऑफिस बॉस, म्हणजे
मलईदार दही
गोड असेल तरच
मिसळीला सही
नाहीतर ठेवा दूरच
घालू नका काही

मिसळ जमली चविष्ट तर
रंगत हमखास
पण सर्वांच्याच नशिबी,
नाती नसतात ना झकास
मग आयुष्यच सारे
होऊन जाते उदास

पण बिघडली चव तरी
प्रयत्न नाही सोडायचे
चवीनुसार पदार्थ
कमी जास्त करत रहायचे
मनाच्या समजुतदारपणाचे
पाणी थोडे घालायचे


हळूहळू मग जमेल मस्त
भट्टी
मिसळीची चवीशी होईल
छान गट्टी
सुखाशी मग आपली
कायमची बट्टी..

-समीर गडकरी



# मुलूखमैदानी तोफ केशवराव धोंडगे

आधुनिक केसरी



ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी तथा शेकापचे नेते भाई केशवराव धोंडगे यांचं निधन झालं. वयाच्या १०२ व्या वर्षी औरंगाबादच्या खाजगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. धोंडगे यांची काही दिवसांपासून तब्येत खालावली होती. २ महिन्यांपूर्वी त्यांचे हर्नियाचे ऑपरेशन झाले होते. त्यांनंतर काही दिवसांपासून त्यांना श्वासोश्वासाचा त्रास होऊ लागल्याने उपचारार्थ औरंगाबादमध्ये दाखल करण्यात आलं होतं.अखेर त्यांची प्राणज्योत मालवली मराठवाड्याची मुलूख मैदानी तोफ, 'मन्याडचा वाघ' अशी ओळख मिळविणारे केशवराव धोंडगे हे १९५७ ते १९९० या काळात सहावेळा विधानसभेत आमदार आणि त्यानंतर एकदा खासदार म्हणून निवडून आले होते. ३ महिन्यांपूर्वीच धोंडगे यांचा विधीमंडळात संसदपटू म्हणून गौरव करण्यात आला होता.

तसंच केशवराव धोंडगे हे पहिले आणि एकमेव असे माजी आमदार होते ज्यांची जन्मशताब्दी राज्याच्या विधिमंडळात साजरी झाली आहे.दिवंगत माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण आणि इतर काँग्रेस नेत्यांच्या समोर तगडं आव्हान उभं करत शेकापं पक्षाला जिवंत ठेवतं धोंडगे हे सहा वेळा आमदार आणि एकदा खासदार म्हणून निवडून आले होते. सभागृहातील कामकाजाची सुरुवात 'वंदे मातरम'ने होणे, मराठवाड्यासाठी स्वतंत्र मंडळाची स्थापना, लोहा तालुक्याची निर्मिती धोंडगेंच्या प्रयत्नातून झाली होती. याशिवाय औरंगाबाद येथे आकाशवाणीचे केंद्र, खंडपीठ आणि परभणी कृषी विद्यापीठासाठीही त्यांनी पुढाकार घेतला होता. धोंडगेनी उपेक्षितांना न्याय देण्यासाठी गुराखी गडाचीही स्थापना केली होती. त्यांचे निधन जरी झाले असले तरी त्यांचे सार्वजनिक कार्य मात्र कायम लक्षात राहील !!

राजू जाधव
मांगूर जि.बेळगांव

# नेत्यांचे राजकारण; सामान्य माणसांचे मरण



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**राजकारण ही अनेक व्यक्तींनी एकत्रितरीत्या निर्णय घेण्याची प्रक्रिया आहे. प्रत्येक राष्ट्रामध्ये सत्ता मिळवण्यासाठी व देश चालविण्यासाठी अनेक नेते जे निर्णय घेतात व जे काम करतात त्यास राजकारण म्हणतात. राजकारण काही नुसतं निवडणुकांपुरतं मर्यादित नाही.राजकारणाचा अर्थ खूप व्यापक आहे. राजकारणाचा हेतू खूप मोठा आहे. दुर्दैवाने आपले नेते मतपेटीसृक्षित राखण्याचे राजकारण करतात. मतपेटीसृक्षित राखण्यासाठी संकुचित दृष्टीकोन ठेवून सामान्य जनतेला वेठीस धरतात.लोकांना धर्माचे जातीचे भाषेचे आमिष दाखवून आपली शक्ती दाखविण्यासाठी सभा,संमेलने आयोजित करतात. सभा, संमेलने, रोड शो दरम्यान लोकांना आमिष दाखवतात, आश्वासने देतात.जनता याला बळी पडत असते.**

भोळी भाबडी जनता नेत्यांच्या अमिषाला बळी पडतात. सभा संमेलने व मोर्चा मध्ये लोकांची गैरसोय होत असते. सभेच्या ठिकाणी चेंगराचेंगरी होवून लोकांचा मृत्यू देखील होत असतो. नेते राजकारण करतात,मरण मात्र सामान्य माणसांचे होत असते. आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि तेलगू देसम पार्टीचे प्रमुख चंद्राबाबू नायडू यांच्या रोड शो घेतला या रोड शो दरम्यानमोठी दुर्घटना घडली आहे. आत्तापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाले आहेत. चंद्राबाबू नायडू कंदुकुरमध्ये रोड शो करत होते. यावेळी त्यांचा ताफा गुडम सीवेज नहरवरुन वरून जात होता. यावेळेस चेंगराचेंगरी झाली आणि काही जण खाली पडले यावेळी तीन जणांचा श्वास कोंडल्याने मृत्यू झाला. दोन जण गंभीर असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. काही जखमींना नेल्लोरमध्ये आणि काही जणांना विजयवाडाला उपचारासाठी पाठवण्यात आलं.

चंद्राबाबू आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री असून गेल्या तीन वर्षापासून आंध्र प्रदेश मध्ये जगमोहन मुख्यमंत्रीआहेत. सत्तेपासून



दूर व्हावं लागल्याने चंद्राबाबू पुढील विधानसभा निवडणुकीची मोर्चेबांधणी करत सभा संमेलने रोड शो आयोजित करून आपली शक्ती दाखवत आहे. राकरण करावे,पण लोकांच्या जीवाशी खेळू नये.रोड शो दरम्यान जी चेंगराचेंगीत झाली,त्यात ज्या लोकांचा मृत्यू झाला त्याला जबाबदार कोण? मृत झालेल्यांचे कुटुंब तर रस्त्यावर आले आहे.गेलेले परत तर येणार नाही न या आधी देखील महाराष्ट्रासह भारतातील अनेक राज्यात व भागात सभा संमेलने व रोड. शो दरम्यान लोकांचा गोंधळ उडून, चेंगराचेंगीत होवून सामान्य जनतेचे मरण झालेले आहे.गोवारी समाजाला आदिवासी दर्जा मिळावा व त्यांना जातप्रमाणपत्रे मिळावीत या मागणीसाठी गोवारी बांधवांनी २३ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपुरात आयोजित विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनावर मोर्चा काढला होता. यावेळी तत्कालीन राज्य सरकारचे हेकेखोर धोरण व पोलिसांच्या लाठीमारामुळे चेंगराचेंगरी होऊन ११४ गोवारी बांधव शहीद झाले. या घटनेला आज, २० वर्षे झाली आहेत. तरीही गोवारी बांधवांची दुर्दशा संपलेली नाही...ब्लँकेट वितरण कार्यक्रमात गर्दी उसळल्याने झालेल्या चेंगराचेंगरीत प बंगाल मध्ये मागील वर्षी तीन महिलांचा मृत्यू झाल्याची घटना पश्चिम बंगालमधील आसनसोल येथे घडली होती. या घटनेत अन्य पाच जण जखमी झाले होते.

# भविष्यातील तंत्रज्ञान बदलणारे जग.. आजोबा ते नातू पणतू..




डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**एकविसाव्या शतकातील एकवीस वर्षे संपली आहेत.आता पुढे आपल्या समोर तंत्रज्ञानाने काय काय वाढून ठेवले आहे हे पाहणे गरजेचे ठरेल.आपल्या आई वडिलांनी ,आजी आजोबांनी औद्योगिक क्रांती पाहिली. इलेक्ट्रिसिटी, स्टीम इंजिन, यामुळे जग गेल्या शतकात आरपार बदलले. विशेष म्हणजे या नव्या उद्योगामुळे नवे रोजगार उपलब्ध झाले. नव्या शैक्षणिक संधी निर्माण झाल्या. त्यानंतर इलेक्ट्रॉनिक अन् संगणक युग आले. आज सत्तरीत असलेल्या पिढीने ही वैज्ञानिक क्रांती अनुभवली. संगणकाचे मूळ इलेक्ट्रॉनिक, सेमीकंडक्टर यात आहे हे विसरून चालणार नाही. याच विज्ञानाने तारेतून होणारे संदेश वाहन अन् नंतर बिनतारी संदेश वहन यंत्रणा निर्माण केली. आश्चर्य म्हणजे बिनतारी संदेश वाहनाचा शोध भारतात लागला, शंभर वर्षांपूर्वी! डॉ. जगदीश चन्द्र बोस यांनी हा शोध कोलकत्ता येथील प्रयोग शाळेत सिध्द केला. तो रॉयल सोसायटी ऑफ लंडन येथे प्रमाणित करून डी एस सी ची पदवी देखील मिळवली.पण हे श्रेय चोरी करून मार्कोनी ने लाटले ,जे चुकीचे होते. यावर नंतर अमेरिकेत शिक्का मोर्तब होऊन डॉ बोस यांनाच मोबाईल वायरलेस कमुनिकेशन चे जनक मानले गेले. इलेक्ट्रॉनिक अन् त्या पाठोपाठ संगणक क्रांती मुळे गेल्या चार पाच दशकांत अभूतपूर्व बदल झाले.**

ता तर इंटरनेट, गूगल, फेसबुक, मोबाईल, लॅपटॉप, या सुविधांमुळे कामाची पद्धत, दळणवळण, कमूनिकेशन,हे सारेच आरपार बदलले आहे, असे कोणतेही क्षेत्र राहिले नाही जिथे संगणकाचा वापर होत नाही. कॉप्युटर लिटर्सी हा नवा शब्द तयार झालाय.तुमचे मूल्य,तुमची क्षमता ही तुम्हाला संगणकातले काय कितपत समजते यावरून ठरवली जाते.संगणकाची ही घोडदौड अन् त्यामुळे सर्वच क्षेत्रांत आलेले वादळ यामागची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. संगणकाची क्षमता.. संगणकाच्या क्षमते मागे मूर्स लॉ ( MOOR'S LAW,१९६५ ) चे तत्व आहे. मूर च्या नियमानुसार,संगणकाची शक्ती ही दर अठरा महिन्यांनी दुप्पट होते! या नियमाने जगाचे आउद्योगिक,वैज्ञानिक,आर्थिक गणित बदलून टाकले! संगणकाची शक्ती म्हणजे जास्तीत जास्त DATA संग्रह करण्याची क्षमता,म्हणजे मेमरी!दुसरे म्हणजे संगणकाची कमीत कमी वेळात जास्तीत जास्त गुंता गुंतीचे गणित सोडविण्याची शक्ती..CALCULATING POWER.. GELYA पन्नास साठ वर्षात या दोंन्ही क्षमता दर अठरा महिन्यांनी दुप्पट होताहेत.या मूर च्या नियमांत अजून तरी खंड पडलेला नाही. या नियमाचा परिणाम असा की लहान मुलाला वाढदिवसाला जे संगणका च्या तत्वावर चालणारे खेळणे मिळते त्याचे किंमत कमी असते पण ते जास्त शक्तीमान असते! पूर्वीचे संगणक मोठे,जड असायचे. आता ते लहान झालेत.पण पूर्वी पेक्षा कितीतरी जास्त क्षमतेचे झालेत.पूर्वीच्या फ्लॉपी, डिस्क गायब झाल्यात. आता छोट्या हलक्या पेन ड्राईव्ह मध्ये आपण किती तरी माहिती, डाटा, फोटोज्, व्हिडिओज, साठवू शकतो. जे सर्किट, कंपोनंट संगणकासाठी वापरतात, ते दिवसेंदिवस लहान होत चालले. त्यामुळे कमीत कमी जागेत जास्तीत जास्त कंपोनंट आपण वापरू शकतो.ते एकमेकांना जोडू शकतो. इथे अर्थातच एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो. हा मूर चा नियम कुठपर्यंत चालेल? प्रत्येक गोष्टीला निसर्ग मर्यादा असतेच. आश्चर्य म्हणजे ती मर्यादा आता जवळ आलीय. जास्तीत जास्त सर्किट कमीत कमी जागेत बसवून संगणका ची क्षमता वाढविणाऱ्या मूर च्या नियमाला खीळ बसण्याची वेळ आता आली आहे.आपल्या कडे किती संगणक तज्ञ किंवा आय टी वाले या समस्येविषयी जागरूक आहेत,किंवा त्या दृष्टीने संशोधन करताहेत?विद्यापीठातील संगणक अभ्यास क्रमाने तरी या समस्येची दखल घेतली का? शंका आहे. कारण कुठलेही संशोधन आजकाल बाहेर होते, तंत्रज्ञान पाश्चात्य देशात विकसित होते. ते जुने झाले की मग आपल्याकडे येते. संगणक क्षेत्रात अशा समस्या नवीन नाहीत.१९९९ साली म्हणजे नवे शतक सुरू होण्यापूर्वी Y२K नावाच्या समस्येने असाच गोंधळ निर्माण झाला होता. तो निस्तर्ताना अनेकांना घाम फुटला होता. मूर चा नियम बाद होताच संगणका वर अवलंबून असलेल्या इंडस्ट्री वर,आर्थिक व्यवस्थेवर, उद्योग क्षेत्रावर खूप गंभीर परिणाम होणार आहेत.याची कल्पना दहा वर्षापूर्वी च फिजिक्स चे प्रोफेसर मीचिओ काकू यांनी एका बीज भाषणातून दिली होती! संगणकाचे मूळ हे फिजिक्स च्या तत्वांवर अवलंबून असते. विद्युत प्रवाह हा प्रकाश वेगाने धावतो. हे संदेश विद्युत चुंबकीय लहरी च्या माध्यमातून प्रवाहित होत असतात.विद्युत लहरी सेकंदाला एकावर १४ शून्य वेळा कंपन पावतात. शिवाय या सर्किट मध्ये प्रामुख्याने ट्रांझीस्टर,सेमी कंडक्टर वापरले जातात. गेल्या अनेक दशकात हे लाखो करोडो सेमी कंडक्तर कमीत कमी जागेत कोंबण्याचा प्रयत्न झाला. याला मिनीयेचरायझेशन अशी संज्ञा वापरतात. हे सर्व करण्याची गुंता गुंतीची प्रक्रिया पाहिली तर त्याला विशिष्ट उर्जा लागते.त्यातून उष्णता निर्माण होते. या उष्णतेचा मूळ सर्किटवर, सेमीकंडक्टर वर परिणाम होतो. ते निकामी होऊ शकतात. या प्रक्रियेसाठी अल्ट्रा व्हायोलेट लाईट चा उपयोग करतात. यामुळे जास्तीत जास्त तीस अणू एव्हढ्याच आकाराचा ट्रानझिस्टर निर्माण करता येतो. अणूच्या आकारा पर्यंत पोहोचणे आता शक्य नाही. आता सिलिकॉन ला पर्याय शोधणे देखील सुरू आहे.. कार्बन नॅनो ट्यूब वर संशोधन सुरू आहे. त्यामुळे २०२० साला



पासूनच सिलिकॉन व्हॅलीचे धाबे दणाणले आहे. सिलिकॉन व्हाली,सिलिकॉन वेफर मागे पडते की काय, नवे काही पर्याय समोर येतात की काय अशी परिस्थिती आहे. त्यामुळे नवे प्रयोग, नवे संशोधन, नव्या संकल्पना जन्म घेताहेत.

इंटरनेट चे मायाजाल..

अर्थात आता पर्यंत आहे त्या मर्यादेत सुध्दा संगणक क्रांती ने जो धुमाकूळ घातलाय तो देखील आश्चर्य कारक असाच आहे.आता आपल्याला संदेश वाहनासाठी इंटरनेट ची गरज भासते.ते कनेक्शन सारी कडे असतेच असे नाही.आपल्या भारता सारख्या देशात इंटरनेट सुविधा नसल्याने खेड्या पाड्यातील शाळा,कॉलेज चे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणाला मुकले होते.पण आता इंटरनेट कुठेही उपलब्ध होऊ शकेल.इंटरनेट चष्मे निघाले आहेत!त्यामुळे आपण कुठूनही काहीही कंट्रोल करू शकतो.घरी जाण्यापूर्वी कूकर, ओवन सुरू करून ,आपण पोहोचेपर्यंत गरम अन्न तयार राहील याची सोय करू शकतो. लहान मुलगा शाळेतून घरी आला की त्याची आई ऑफिस मधून रिमोटने दार उघडू शकते, मूल सुरक्षित आत जाऊ शकतं! खरे तर निदान अनेक कामे अशी आहेत जी घर बसल्या होऊ शकतात. त्यासाठी ऑफिस LAA जायची गरज नाही. हे करोणा काळात सर्वानी अनुभवले आहे.त्यामुळे एव्हढी मोठमोठी ऑफिसेस,इमारती,त्यासाठी होणारा लाखोंचा मासिक खर्च,विजेचा खर्च ह्याची काय गरज असे प्रश्न निर्माण झाले.आता तर बरेच शिक्षण ऑनलाईन होणार. यू ट्यूब वर ची लेक्चर्स वर्गातील अननुभवी प्राध्यापका पेक्षा जास्त रंजक असतात.प्रवास खर्च,वेळ,इंधन यांची बचत होते ती वेगळी.यामुळे साहजिकच आर्थिक गणित बदलते. लोक मीटिंग साठी पैसा खर्च करायचे.गेल्या दोन वर्षात सर्व मीटिंग,परिषदा,ऑनलाईन झाल्या.काही बिघडले नाही.लाखो रुपये वाचलेत!

**रोबोट क्रांती..**

ड्रायवर विना चालणाऱ्या गाड्या,मेट्रो,ही आणखीन एक क्रांती.यामुळे अपघाताचे प्रमाण कितीतरी पटीने कमी होईल,जीव वाचतील हे सप्रमाण सिध्द झालेय.यासाठी साटेलाईट अन् जी पी एस यंत्रणेचा उपयोग होतो.यामुळे ट्रॅफिक जाम हा प्रकारच दिसणार नाही.सगळे नियमानुसार शिस्तीत घडेल.जी कामे माणूस बुध्दी च्या जोरावर करतो ती सर्व कामे संगणकाचा उपयोग करून अधिक अचूक,अधिक जलद,अधिक पद्धतशीरपणे होतील. संगणक,रोबोट याचा उपयोग युद्ध क्षेत्रांत होऊ शकतो.जी कामे करण्यात सैनिकांना हवामानामुळे अडचणी येतात ती दुर्गम भागातील कामे रोबोट संगणक करतील.काम झाले की कचरा म्हणून आपण अनेक वस्तू फेकतो.आधुनिक तंत्रज्ञान पुढे आले की जुन्याचा कचरा होतो.नव्हे टीव्ही चे,मोबाईल चे मॉडेल आले की जुन्याची किंमत कमी होते.याचा बाजार व्यवस्थेवर परिणाम होतो. पैसा आहे ते नव्या वस्तू घेतात.जुन्या वस्तू कमी किमतीत तुलनेने गरीबांना घेता येतात.फायदा सर्वांना होतो. अमेरिकेत यामुळे ई कचऱ्याची समस्या निर्माण झाली आहे. आपल्याकडे देखील कॉलेजात, ऑफिसात **क्रमशः**

# उपेक्षित संगीतकार सी. रामचंद्र



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली


आधुनिक केसरी

**'ऐ मेरे वतन के लोगों...' हे गाणे 59 वर्षांपासून देशातल्या नसानसांमध्ये सळसळते आहे. या गाण्याने राजा आणि रंक दोघांच्याही डोळ्यांत पाणी आणले आहे. शहिदांचा सन्मान करताना सरकारे आपल्या पद्धतीने मदत करतात. सैन्य दल तोफांची किंवा बदुकांच्या फैऱ्यांची सलामी देऊन शहिदांना शेवटचा निरोप देतात. जनता शहिदांचा सन्मान करताना डोळ्यांत अश्रू आणून त्यांना आपल्या हृदयात जागा देतात. चित्रपटसृष्टीने शहिदांच्या सन्मानाच्या रुपात 'ऐ मेरे वतन के लोगों...' सारखे गाणे दिले. ऐ मेरे वतन के लोगों... हे गाणे शहिदांच्या हौत्माम्याचे स्मरण करण्यासाठी रचले गेले होते. पण या गाण्याचा उद्देश होता, 1962 मध्ये मिळालेल्या पराभवाने खचून न जाता त्यांचे मनोबल वाढवण्याचे!**

गाण्याचा शेवट आहे, 'जय हिंद,जय हिंद की सेना... ' गाण्याच्या काही अंतऱ्यांमध्ये सैन्याच्या रेजिमेंटांचा हवाला होता आणि सांगितले गेले होते की, आमच्या एका एका वीर जवानांनी दहा-दहा शत्रू सैन्यांना मारले.

ज्यावेळेला सरकारने चित्रपटसृष्टीकडे मदतीची अपेक्षा केली, तेव्हा सगळ्याच संगीतकार, निर्मात्यांनी आपापल्या परीने मदत केली. काहींनी आपलीच जुनी गाणी सादर केली. मात्र त्यावेळेला महबूब खान एक दिवस कवी प्रदीप यांच्या घरी पोहचले. आणि त्यांना आपल्या देशाच्या सैनिकांच्या मदतीसाठी एक गाणे लिहिण्याची विनंती केली. हे गाणे सरकारच्या विनंतीनुसार लिहिले गेले असल्यामुळे यासाठी कवी प्रदीप यांना कसलाही मोबदला मिळाला नाही. प्रदीप यांची इच्छा होती की, हे गाणे लता मंगेशकर यांनी गावावे. त्यावेळेला लता मंगेशकर आपल्या कामात व्यस्त होत्या, त्यामुळे त्यांनी पहिल्यांदा नकार दिला. अधिक विनंती केल्यावर या गाण्याचे दोन भाग करण्याचे ठरले. एक भाग लता मंगेशकर आणि दुसरा भाग आशा भोसले यांच्या आवाजात 27 जानेवारी 1963 रोजी दिल्लीच्या नॅशनल स्टेडिअमवर पहिल्यांदा गायले जाणार होते. वर्तमानपत्रांमधल्या जाहिरातींमध्ये आशा भोसले यांच्याही नावाचा या गाण्याची एक गायिका म्हणून उल्लेख केला जात होता. आशा भोसले यांनी या गाण्याच्या रिहर्सलमध्येही भाग घेतला होता.या गाण्याच्या संगीताची जबाबदारी सी. रामचंद्र यांच्याकडे सोपवण्यात आली होती. संगीतकार सी. रामचंद्र यांच्या दिग्दर्शनाखाली लता मंगेशकर यांनी अनेक गाणी गायली होती आणि त्यांच्यातला ताळमेळ चांगला जुळला होता. पण काही कारणांमुळे 1958 पासून लता मंगेशकर आणि सी. रामचंद्र यांच्यातील बोलणेच बंद होते. अण्णा म्हणजेच सी. रामचंद्र यांनी 26 जानेवारी 1963 रोजी लता मंगेशकर यांना या गाण्याची टेप दिली. पण शेवटच्या वेळी आशांनी लता यांना आपण दिल्लीला जाणार नसल्याचे सांगितले. लता मंगेशकर यांच्यासह अनेक संगीतकारांनी आशा यांची खूप मनधरणी केली.पण त्या आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या. शेवटी 26 जानेवारी 1963 रोजी मुंबईतून एक फ्लााइट पकडून लता, दिलीप कुमार, महबूब खान, राजकपूर, शंकर जयकिशन, सी. रामचंद्र यांचे सहाय्यक मदन मोहन आदी मंडळी दिल्लीला रवाना झाली. फ्लाइटमध्ये लता मंगेशकर यांनी ते गाणे ऐकले, जे सी.रामचंद्र यांनी टेपमध्ये दिले होते. 27 जानेवारी रोजी ते गाणे त्यांनी नॅशनल स्टेडिअमवर गायले. गाणे संपल्यावर स्टेजच्या पाठिमागे असलेल्या लता यांना महबूब खान यांनी त्यांना पंतप्रधान पंडित नेहरू बोलावत असल्याचा निरोप दिला. नेहरू यांनी लता मंगेशकर यांचे कौतुक केले आणि तुमच्या गाण्याने माझ्या डोळ्यांत पाणी आणले, असे सांगितले.

हे गाणे दिल्लीत ज्यावेळेला गायले गेले, त्यावेळेला तिथे ना या गाण्याचे संगीतकार सी. रामचंद्र होते, ना कवी प्रदीप! नंतर ज्यावेळेला नेहरूंना मुंबईला जाण्याची संधी मिळाली, त्यावेळेला त्यांनी आवर्जून कवी प्रदीप यांची भेट घेतली. मात्र अण्णा शेवटपर्यंत उपेक्षितच राहिले. ऐ मेरे वतन के लोगों... या गाण्याने इतिहास रचला. या गाण्याने भारतरत्न लता मंगेशकर यांच्या करिअरला नवी उंची दिली. या गाण्याचे गीतकार प्रदीप यांना दादासाहेब फाळके पुरस्कार



मिळाला. या गाण्याची एक ओळ आहे, तुम भूल न जाओ इनको... इसलिए कही ये कहानी. पण दुर्दैवाने या गाण्याचे संगीतकार सी. रामचंद्र मात्र शेवटपर्यंत उपेक्षित राहिले. अण्णा यांनी शास्त्रीय संगीत, लोकसंगीत यांचा मेळ घालत जी गाणी रचली होती, ती खूपच लोकप्रिय ठरली. ऐ मेरे वतन... पूर्वीही अण्णा यांनी 'आना मेरी जान संडे के संडे...' (शहनाई, 1947), 'मेरे पिया गये रंगून... '(पतंगा,1949) सारखी लोकप्रिय गाणी दिली होती. सी.रामचंद्र यांचे वडील नागपूरला रेल्वेत स्टेशन मास्तर होते. धाकट्या रामचा अभ्यासापेक्षा संगीताकडे असलेला ओढा पाहून त्यांनी तेथील सप्रे गुरुजीकडे काही वर्षे शास्त्रीय संगीत शिकण्यासाठी ठेवले, तेथून पुण्यातही काही काळ संगीत विद्यालयात जाऊन त्यांनी संगीताचे धडे घेतले. त्यांचे ध्येय इन्स्पेक्टर किंवा सिनेनायक होण्याचे होते. देखणा चेहरा व 6 फुटापर्यंतची उंची नि मधूर आवाज यामुळे आपणास नायकाचे काम सहज मिळेल, असे त्यांना वाटले.यासाठी त्यांना खूपच स्ट्रगल करावे लागले. अखेर त्यांना बी. व्ही. राव यांच्या 'नागानंद' चित्रपटात नायकाचे काम मिळाले, पण तो चित्रपट आपटला. पुढे रामचंद्र सोहराव मोदींच्या मिनर्व्हा मुव्हीटोनमध्ये एक्स्ट्रा म्हणून नोकरीस लागल्यावर "सैदे हवस' या चित्रपटात त्यांना एक छोटीसी भूमिका मिळाली. मोदींचे संगीतकार तेव्हा मीरासाब होते. रिकाम्या वेळात राम चितळकर मीरसाबच्या ताफ्यातील वाद्ये वाजवत रहात, ते पाहून एकेदिवशी मोदी म्हणाले, "तुला अभिनय काही जमत नाही, तुझा ओढा संगीताकडे आहे, तू तिकडे लक्ष दे! मग त्यांनी मीरासाबचा सहाय्यक म्हणून अण्णांना नेमले. त्यांच्या हाताखाली चितळकर नोटेशन करण्यात तरबेज झाले.

नंतर ते स्वतंत्रपणे आण्णासाहेब या नावाने संगीत देऊ लागले. सिनेनिर्माते व दिग्दर्शक जयंत देसाईनी त्यांचे सी. रामचंद्र असे नामकरण केले.

अण्णानी संगीत साज चढवलेला फिल्मीस्तानचा "सफर" (1947)खूप गाजला. त्यातील अमीरबाई कर्नाटकीने म्हटलेले "मारी कटारी मर जाना" हे ठसकेबाज गीत रेडिओ सिलोनवर लागते तेव्हा काळजात कट्यार घुसते! रफीलाही यात 'कह के भी न आये तुम अब छुपने लगे तारे', "अब वो हमारे हो गये, इकरार करे या न करे? अशासारखी माधुर्याने भरलेली गाणी दिली. गेल्या पिढीतील दिग्गज नायकांसाठीही अण्णांनी पार्श्वगायन केले होते. 1. अशोककुमार 'संग्राम, शतरंज' मीनाकुमारी नायिका असलेल्या या चित्रपटात अण्णानी अशोककुमारसाठी एक गझलही गायली होती. 2. राजकपूर, 'सरगम, शारदा', 3. देवआनंद बारीश, अमरदीप, सरहद्द, 4. दिलीपकुमार 'नदिया के पार, इन्सानियत, समाधी, पैगाम, आझाद. लताचा अण्णांच्या संगीतात उदय होण्यापूर्वी ललिता देऊलकर (नंतरच्या सौ. सुधीर फडके) शमशाद बेगम, सुरिंदर कौर, बिनापानी मुकर्जी, मिनाकपूर, सरस्वती राणे, जोहराबाई अंबालावाली, अमिरबाई कर्नाटकी, मोहनतारा अजिंक्य, गीता दत्त व 'दुनिया'त सुरैय्या आदींना घेऊन आपले संगीत लोकप्रिय केले होते. 1. 'ठुकराके ओ जानेवाले. 2. दिल को भुल दो तुम हमें. या पतंगाच्यावेळी गीतकर राजेंद्रकृष्णचा अण्णांच्या संगीताल प्रथम प्रवेश झाला. राजेंद्रची गाणी अण्णांचे संगीत दोघांनी मिळून अनेक चित्रपट हिट केले!

पूर्वी हिंदी सिनेसंगीतांत पंजाबी व उत्तर हिंदुस्तानी वादकांची मोनॉपाली होती, ती मोडून काढीत अण्णांनी आपल्या वाद्यवृंदात महाराष्ट्र व गोव्यातील वादकांचा समावेश केला. तमाशातील ढोलकीपटू लाला गंगावनेला आपल्याकडे घेतले. 'नदीया के मार'मधील 'दिल दे के भागा दगा देके भागा' हे गाणे अण्णासह ललित देऊळकरने ठसक्यात म्हटले होते. यात अण्णानी जोगतीणींच्या ताफ्यात वाजविल्या जाणाऱ्या चौंडक या तालवाद्याचा वापर हिंदी सिनेसंगीतात प्रथमच केला! अण्णानी बेन या ख्रिश्चन तरुणीशी लव्ह मॅरेज केले होते. बेनचे - पहिले मूल डिलिव्हरी दिवशीच दगावल्यावर 'आता यांना परत मूल होणार नाही, असे डॉक्टरांनी सांगितल्यावर काही काळाने त्यांनी दुसरे लग्न करून घेतले. या दुसऱ्या पत्नीपासून त्यांना एक मुलगा, एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली. पुढे पत्नीच्या जाण्याने खचलेले अण्णा आपल्या दोन मुलांच्या वात्सल्याने बरेचसे सावरले. आपल्या भरल्या संसारातील शेवटच्या कालखंडात सुखी झालेले अण्णा शांतपणे वयाच्या 63 व्या वर्षी आपल्यातून निघून गेले!

# दहा वर्षांच्या मुलाला आईची किडनी देऊन पुनर्जन्म !

## कमलनयन बजाज रुग्णालयात दुर्मिळ शस्त्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अवघ्या दहा वर्षाच्या मुलाला किडनीच्या आजाराने ग्रासले असताना जन्मदाती आईने आपली किडनी देत त्या मुलाला पुनर्जन्म मिळवून दिला. दुर्मिळ अशी ही शस्त्रक्रिया कमलनयन बजाज रुग्णालयात पार पडली. लहान बालकामध्ये किडनी प्रत्यारोपण आणि त्यानंतरचे प्रदीर्घ चालणारे उपचार आता औरंगाबादमधील कमलनयन बजाज रुग्णालयात एकाच छताखाली उपलब्ध आहेत. जन्मापासूनच किडनीच्या आजाराने ग्रस्त असलेल्या बालकाचे कमलनयन बजाज रुग्णालयात बाल किडनी विकार तज्ञ डॉ. पंकज भंसाळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार चालू होते. औषधोपचारावर नऊ वर्षे बालकाची प्रकृती स्थिर राहिली. परंतु, कालांतराने किडनीची क्षमता घटल्याने क्रियाटनीन व युरिया हे रक्तातील घटक वाढत गेले. बालकास त्रास वाढल्यामुळे कमलनयन बजाज रुग्णालयात डायलिसीस चालू झाले. डायलेसिस बंद व्हावे यासाठी किडनी प्रत्यारोपण हाच एक मार्ग असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यानंतर रुग्णाच्या आई आपली किडनी देण्यासाठी तयार झाल्या. संपूर्ण वैद्यकीय तपासण्याअंती त्या उत्कृष्ट डोनर दिसून आल्या. अवयव प्रत्यारोपण समन्वयकांनी कायदेशीर बाबी पूर्ण करून शासनाकडून किडनी प्रत्यारोपण करण्यासाठी लागणारी परवानगी मिळवली. किडनी विकार व प्रत्यारोपण तज्ञ डॉ. समीर महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली किडनी प्रत्यारोपणासाठी रुग्ण भरती झाला. ९ डिसेंबर २०२२ रोजी कमलनयन बजाज रुग्णालयात किडनी विकार व प्रत्यारोपण तज्ञ डॉ. समीर महाजन, बाल किडनी विकार व प्रत्यारोपण तज्ञ डॉ. पंकज भंसाळी, किडनी प्रत्यारोपण सर्जन डॉ. शरद सोमाणी व डॉ. आदित्य येळीकर, भूलतज्ञ डॉ. सचिन नाचने व टीम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी किडनी प्रत्यारोपण झाले असून बालकाची प्रकृती उत्तम आहे. शिवाय बालकाला रुग्णालयातुन सुटीदेखील मिळाली आहे. या दरम्यान मेडिकल डायरेक्टर डॉ. मिलिंद वैष्णव व बालरोग विभागप्रमुख डॉ. निखिल पाठक यांचे मार्गदर्शन लाभले. लहान बालकामध्ये किडनी प्रत्यारोपण आणि त्यानंतरचे प्रदीर्घ चालणारे उपचार आता औरंगाबादमधील कमलनयन बजाज रुग्णालयात एकाच छताखाली उपलब्ध आहेत. त्यामध्ये बाल व नवजात शिशु अतिदक्षता विभाग अत्याधुनिक



तंत्रज्ञानाने सुसज्ज असून तज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत आहे. रुग्णालयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नताशा वर्मा यांनी सर्व टीमला या यशाबद्दल शुभेच्या दिल्या. रुग्णालयाचे विश्वस्त सी. पी. त्रिपाठी यांनी त्या मुलाच्या दीर्घ आयुष्यासाठी शुभेच्या दिल्या आहेत. मोठ्याप्रमाणेच लहान मुलांच्या किडनी निकामी झाल्यास तीन पर्याय उपलब्ध असतात. हिमोडायलेसीस, पेरीटोनियल डायलिसिस आणि किडनी प्रत्यारोपण. यापैकी लहान मुलांची शारीरिक व मानसिक वाढ लक्षात घेता त्यांना दीर्घ आयुष्य मिळण्याकरीता किडनी प्रत्यारोपण हा एकमेव लाभदायक पर्याय असतो, असे किडनी विकार व प्रत्यारोपण तज्ञडॉ. समीर महाजन यांनी सांगितले. बालबाह्य रुग्ण विभागात दहा टक्के रुग्णांना किडनी संदर्भातील विकार आढळून येतात. त्यातील बहुतांश विकार हे वेळीच तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्णपणे बरे होतात. लहान मुलांमधील किडनी विकार यावरील उपचार पद्धतीमध्ये अतिशय सुधारणा होत आहेत. ज्या बालकांमधील किडनी निकामी असेल त्यांसाठी देखील डायलिसिस आणि किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया कमलनयन बजाज रुग्णालय औरंगाबाद येथे उपलब्ध आहेत. किडनीचे आजार क्लिष्ट असले तरी तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य उपचार मिळाल्यास बाळाचे आयुष्य प्रदीर्घ आणि सुखकर राहू शकते, असे बाल किडनी विकार व प्रत्यारोपण तज्ञ डॉ. पंकज भंसाळीयांनी नमूद केले.



# कालीमठच्या भाविकांना न्याय मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही : शिवसेना नेते खैरे

## कालीमठ संघर्ष समितीच्या उपोषणास दिली भेट

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील श्री कालीमठ ट्रस्ट उपळा ही स्वामींच्या पावन स्पर्शाने पवित्र झाली आहे. या भूमीला पूर्वपदावर आणण्यासाठी वाटेल ते करण्याची तयारी आहे. कालीमठच्या भाविकांना न्याय मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असे शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी सांगितले. कालीमठ येथे पंचक्रोशीतील भाविकांनी उपोषण सुरू केले आहे, त्यावेळी चंद्रकांत खैरे बोलत होते.

धर्मादाय आयुक्त यांनी ए ३४१४ मान्यता दिली आहे. येथील या ट्रस्टने गेल्या अनेक वर्षांत नियमबाह्य कामकाज व बेकायदेशीर कामांची तक्रार पंचक्रोशीतील भाविकांनी केली. मात्र यावर कुठल्याही प्रकारची कायदेशीर कारवाई झाली नाही. त्यामुळे या कामाची चौकशी करा, अशी मागणी कालीमठ संघर्ष समितीने केली आहे. २ जानेवारीपासून मंदिर परिसरात आमरण उपोषण सुरू असून दुसऱ्या दिवशी चंद्रकांत खैरे यांनी भेट दिली. कालीमता आणि परमपूज्य स्वामी प्रणवानंद सरस्वती यांचे आपण सर्व भाविक असून यासाठी आता हा लढा थांबणार नाही. यावेळी धर्मादाय आयुक्त, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपअधीक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, वन अधिकारी यांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधून कार्यवाही करण्याची मागणी यावेळी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी केली. यावेळी स्वामी उध्दव महाराज, राज चैतन्य महाराज, आमदार उदयसिंग राजपूत, तालुका संघटक डॉ. अण्णासाहेब शिंदे, सरपंच अशोक दाबके, नामदेव जाधव, उपतालुका प्रमुख शिवाजी थेटे, राजू बेला राठोड, सोपान गोलाईत, काकासाहेब कवडे, सगार जाधव, नगरसेवक बंटी सुरे, युवासेना तालुका अधिकारी योगेश पवार, रामराजे देशमुख, राजू गोलाईत, गुलाबराव साळुंके, नवनाथ गोलाईत, कांतीलाल बाविस्कर, दत्तू मोरे, गोविंद जाधव, अशोक जाधव, सोनाजी मोरे, संतोष अकोलकर, आप्पासाहेब अकोलकर, सुनील व्यवहारे, कैलास लोखंडे, विनोद बागुल, गणेश वाघ आदींसह मोठ्या संख्येने महिला भगिनी, बांधव आणि भाविक उपस्थित होते.

# चिंगारी शक्ती फाऊंडेशनने केले 2023 चे कॅलेंडर प्रकाशित

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दै मुंबई हसलचे संपादक दिलशाद एस. खान यांचा चिंगारी शक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा पिंकी राजगर्या यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. चिंगारी शक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती पिंकी राजगर्या आणि त्यांचे सहकारी प्रिन्स जी यांनी महिला सक्षमीकरणासाठी एक आदर्श घालून 12 सामान्य महिलांसह वर्ष 2023 साठी एक कॅलेंडर प्रकाशित केले, या दिनदर्शिकेचे प्रकाशन आणि उद्घाटन द मालाड, मुंबई येथे झाले. ग्लास हाऊस येथे. मिसेस सेज युनिव्हर्स 2017 च्या विजेत्या श्रीमती पिंकी राजगर्या, TEDX स्पीकर, चिंगारी शक्ती फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा, यांनी आपल्या फाउंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी खूप चांगले काम केले आहे आणि हे कॅलेंडर देखील त्याचाच एक भाग आहे, बारा. सामान्य जीवनातून आलेल्या महिला, कुणी बँकर, कुणी डॉक्टर, कुणी मॉडेल, कुणी गृहिणी, कुणी आई, कुणी आजी, अशा प्रकारे १२ महिलांनी या कॅलेंडरमध्ये मॉडेलची भूमिका साकारली, या कॅलेंडरचे अनावरण आरोग्य गुरु, इन्स्पेक्टर मि. मिकी यांच्या हस्ते करण्यात आले. मेहता. यावेळी द मुंबई हलचल वृत्तपत्राच्या संस्थापक व संपादक श्री.श्रीमती पिंकी राजगर्या, तारा माँ चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्री. धर्मेश जोशी, बेटी बचाओ बेटी पढाओ चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष श्री. डॉ. प्रमुख पाहुणे अजय एल दुबे जी, पीव्हीः लीगल अँड लाइफस्किलचे श्री हिमांशू पंड्या आणि तारा मा चॅरिटेबल टेस्टने नियुक्त केलेले ट्रान्सजेंडर सोशल वेल्फेअर आणि एम्पॉवरमेंट मॅनेजर अन्नू काडे दी दी यांना आमंत्रित केले होते, या प्रमुख पाहुण्यांसोबत आणि सौ. पिंकी राजगर्या जी त्यांचे कुटुंबीय आणि लायन्स क्लबचे प्रमुख अध्यक्ष व अध्यक्ष उपस्थित होते. यावेळी मिकी मेहता जी यांनी दीपप्रज्वलन करून कॅलेंडरचे उद्घाटन केले आणि उपस्थित सर्व लोकांना शुभेच्छा दिल्या. केक कापल्यानंतर सर्व मॉडेल्सनी रॅम्प वॉक केला आणि श्रीमती पिंकी जी यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले. या संपूर्ण घटनेचे वृत्तांकन. मुंबई हुलचुल वृत्तपत्राने केले, सर्व पाहुण्या तज्ज्ञांनी भाषणात श्रीमती पिंकी राजगर्या यांच्या कार्याचे कौतुक केले आणि त्या व त्यांची संस्था चिंगारी शक्ती फाउंडेशनच्या पाठीशी राहण्याची ग्वाही दिली.



# आरोग्य अधिकारी दालनात राष्ट्रवादीचा 'आक्रोश'

## तर पालिकेतून धिंड काढू व तोंडाला काळे फासू : रणजित भोसले

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील घाणीचे साम्राज्य भटक्या कुत्र्यांचा आहाकार व काही अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार उघड आणून त्यांच्याविरुद्ध आक्रोश आंदोलन करण्यात आले.

शहरात आरोग्य विभागाचे मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालू आहे धुळे शहरात संपूर्ण ठिकाणी पिसाटलेले रेबीज कुत्र्याने धुमाकूळ घातला आहे जवळपास हजारोंच्या संख्येने कुत्र्यांची संख्या वाढली आहे कित्येकदा आरोग्य कर्मचाऱ्यांना सांगून कुठलाही प्रतिसाद देत नाही संपूर्ण शहरात घाणीचे साम्राज्य असताना कुठलेही चांगली व्यवस्था नाही व करोडो रुपये देऊन ठेका घेऊन मनुष्यबळ उभे केले तरीही कर्मचारी साफसफाई करत नाही असा आरोप राष्ट्रवादीचे रंजीत भोसले यांनी केला. अधिकाराच्या



संगनमताने परस्पर सह्या करून त्यांची पगार केली जाते असा मोठा भ्रष्टाचार सर्व अधिकारी मिळून करत असतात काही फवारणीसाठी करोडचा ठेका दिला असून कर्मचारी फवारणी करताना दिसत नाही व फवारणी न करता करोडोचे बिल पास होतात. सफाईसाठी जेसीबी मागितल्यावर दोन ते तीन महिने लागतात व त्याला खाजगी ठिकाणी देऊन त्याचे भाडे खातात व जेसीबी कामावर आहे असे दाखवून रोज चार ते पाच हजार चा झोल करत असतात असे आरोप धुळे राष्ट्रवादी तर्फे करण्यात आले.

# सतीश शुक्ला यांच्या हस्ते वृद्धाश्रम इमारतीचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील गदाना बोरवाडी शिवारातील दैवत मनोरुग्ण व वृद्धाश्रमाच्या इमारतीचे भूमिपूजन हरियाली फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सतीश शुक्ला यांच्या हस्ते झाले यावेळी प्रमुख पाहुणे जिल्हा पेन्शन अशुशयांचे अध्यक्ष व संत सहनिष् सचिव नामदेव घुगे उपाध्यक्ष पी. टी. कुलकर्णी रखमाजी जाधव मस्ताना ग्रुपचे वसीम अंतरी मातोश्री आश्रमाचे सागर पोगरे, गोळेगावचे उपसरपंच संतोष जोशी अण्णा वाचवा समितीचे अनंत मोताळे अजित राणा अँड चंदजियाने खुलताबाद असोशियन, सचिव सकाहरी वारूळे, मच्छिंद्र हार्वे, आप्पासाहेब तुपे, समाजसेवक महबूब पठाण आदींची उपस्थिती होती.

तीन वर्षापासून येथे भाडे तत्वावर जागा व शेड घेऊन मनोरुग्ण व वृद्ध निराधार लोकांसाठी आश्रम सुरू केला आता वृद्धाश्रमाच्या स्वतःच्या जागेवर इमारत बांधण्यात प्रारंभ झाला आहे. याप्रसंगी सतीश शुक्ला यांनी वृद्धाश्रम साठी 51 हजार रुपयाची देणगी आश्रमातील नागरिकांना प्रत्येकी दोन ड्रेस देऊन त्यांचा वर्षभराच्या अन्नदानाचा खर्च स्वतः करणार असल्याचे सतीश शुक्ला यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. वृद्धाश्रमाच्या उमा तुपे यांनी प्रस्ताविक मांडून आभार मानले.



# रस्ते नियमांची खबरदारी घ्यावी

## अविनाश राऊत यांचे प्रतिपादन; भोकरला रस्ता सुरक्षा रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** आपल आरोग्य हे सुखकर करण्यासाठी आपण सदैव सावध राहावे. दुचाकीवरून प्रवास करताना हेल्मेटचा वापर करीत नाही म्हणून शरीराला गंभीर दुखापत होते. अनेकदा जीव गमवावा लागतो. सुखकर जीवनासाठी स्वताची स्वता काळजी घेणे गरजेचे आहे. रस्त्यावरील नियमांची पायमल्ली होणार नाही याची खबरदारी घेणं काळाची गरज आहे, असे प्रतिपादन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अविनाश राऊत यांनी बुधवारी ता. (चार) केले आहे. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे रस्ता सूरक्षा हेल्मेट रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूसरे सह दिवाणी न्यायाधीश डी.डी.माने होते.प्रमुख पाहूणे म्हणून प्रादेशिक परिवहन अधिकारी शैलेश कामत, मोटार वाहन निरीक्षक मनोज चव्हाण, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रवीण रहाणे, प्राचार्य डॉ. पंजाब चौव्हाण यांची उपस्थिती होती. राऊत म्हणाले की, दिवसेनदिवस रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. वाहन चालकांनी नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली तर यावर आळा बसू शकतो. विज्ञानयूगात नवनवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे. प्रामुख्याने मोबाईल अत्यावश्यक बाब झाल्याने त्यांची आपण कटाक्षाने काळजी घेतल्याने ते सुरक्षीत राहते. दुचाकीवरून प्रवास करताना गंभीर दूखापत होऊ नये म्हणून जर हेल्मेटचा वापर केला तर आपण अगदि सूरक्षीत राहू शकतो. जीवन हे अनमोल आहे त्याची काळजी घेणं गरचेच आहे, असे सांगितले. मनोज चव्हाण यांनी सुत्रसंचलन करून आभार मानले. यावेळी बहूसंख्य नागरिक, युवकांची उपस्थिती होती.

# पीरबावडा येथे नवनिर्वाचित सरपंच यांचा पंचक्रोशीतील मित्र परिवारातर्फे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** येथील नवनिर्वाचित सरपंच डॉ सारंग पा. गाडेकर व गेवराई पायगा येथील नवनिर्वाचित सरपंच मंगेश साबळे यांचा आज पिरबावडा व पंचक्रोशीतील मित्र परिवारातर्फे सत्काराचा कार्यक्रम झाला व पुढील कार्यासाठी सुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी मंगेश साबळे व डॉ. सारंग गाडेकर यांनी उपस्थित पंचक्रोशीतील मित्र परिवारास मार्गदर्शन केले यावेळी बोलताना सांगितले की जनतेनी टाकलेल्या विश्वासाच सोन करून तळागाळातील जनसामान्यांचे काम अगदी सहज व कुठल्याही दलालाना थारा न देता केल्या जातील. कुठल्याही अडचणी, समस्या व कामांसाठी कुणालाही न भेटता थेट सरपंच व ग्रामसेवक यांना ग्रामपंचायत कार्यालयात भेटून आपली कामे करून घेण्याचे आवाहन ही त्यांनी यावेळी केले. त्याचप्रमाणे पिरबावडा पंचक्रोशीतील कुठल्याही गावातील व्यक्तीने हक्काने आम्हला काम सांगावी ती काम करण्याचा प्रयत्न आम्ही करू असे ही आश्वासन यावेळी दोन्ही नवनिर्वाचित सरपंच यांनी दिले.

यावेळी राजू खैरनार, कृष्णा पाटील, साईनाथ बेडके, भुजंगराव साबळे, सुभाष कोंडके, रामकृष्ण कोंडके, जनार्धन तुपे, कैलास इधाटे, ज्ञानेश्वर गाडेकर, उमेश फलफले, निवृत्ती काळे, वाजेद शेख, पंडित साठे, भगवान गाडेकर, भाऊसाहेब इधाटे आदी पंचक्रोशीतील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.




# चौथा स्तंभ विशेष राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार दादासाहेब घोडके यांना जाहीर

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** अप्रतिम मीडिया प्रायोजित चौथा स्तंभ विशेष पत्रकारिता राज्यस्तरिय पुरस्कारांची घोषणा



करण्यात आली. दरवर्षी प्रिंट व इलेक्टॉनिक माध्यमातील पत्रकारांना त्यांचे विशेष कौशल्य व गुणवत्ता लक्षात घेऊन चौथा स्तंभ या राज्यस्तरिय पुरस्काराने सन्मानित केले जाते. यंदा पुरस्कार वितरण सोहळा ६ जानेवारी पत्रकार दिनी मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,विरोधी पक्ष नेते अजित पवार,अंबादास दानवे व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती संयोजक डॉ . अनिल फळे यांनी दिली. महाराष्ट्रतील विविध विषयांवर लिखाण केलेल्या पत्रकारांना प्रतिष्ठेचा मानल्या जाणाऱ्या राज्यस्तरावर यंदाच्या 2023 च्या विशेष पर्यटन वृत्ती दखल घेत दादासाहेब घोडके यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याने यासाठी पैठण तालुका मराठी पत्रकार संघ, शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया, तालुका व्यापारी महासंघाचे सचिव रामेश्वर सुसे, फोटोग्राफर अशोशियनचे अध्यक्ष रूचिर भगत, मुद्रण अशोशियनचे अध्यक्ष सचिन उंडाळे, पानटपरी अशोशियनचे अध्यक्ष सुनील हिंगे,तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माऊली मुळे यांनी अभिनंदन केले.



# धर्माबाद येथे मारोतराव कवळे गुरुजी यांच्या हस्ते शॉर्ट बाँड्री क्रिकेटच्या खुल्या सामन्याचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** आज धर्माबाद येथे भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त औचित्य साधुन प्रज्ञा संघ क्रिकेट क्लब बाळापुर तालुका धर्माबाद आयोजित करण्यात आलेल्या भव्य खुले शॉर्ट बॉण्ड्री क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले यावेळी नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या हस्ते सदरील क्रिकेट सामन्याचे उद्घाटन करण्यात आले.

प्रथम पारितषिक मारोतराव कवळे गुरुजी यांच्या वतीने तर दवतिय पारितोषिक सामाजिक कार्यकर्ते जे. के. जोंधळे यांच्या वतीने तसेच मेंन ऑफ सिरीज पत्रकार सतीश पाटिल शिंदे यांच्या वतीने देणयात येणार आहे. यावेळी माजी नगरसेवक सुधाकर जाधव, जे. के. जोंधळे, काँग्रेसचे शहराध्यक्ष ताहेर पठाण, मोहन पाटील बाळापूरकर, श्रीनिवास पाटील ढगे इज्जतगावकर, प्रल्हाद पाटील हिवराळे, सतीश पाटील शिंदे, मनसे शहर अध्यक्ष सचिन रेड्डी चाकरोड, किरण सोनकांबळे, चेतन घाटे, साईनाथ शिरपुरे, मनोज बुंदले भगवान कांबळे, आदिजन उपस्थित होते.

बाळापूर येथे प्रज्ञा संघ यांच्या वतीने सलग दोन वर्ष ही स्पर्धा आयोजित करण्यात आली यातून ग्रामीण भागातील खेळाडूंना हकाचे व्यासीठाव उपलब्ध झाले खेळाडूंनी प्रामाणिक पणे खेळ खेळून विजयी व्हावे . खेळ म्हणल्यावर यश किंवा अपयश येणारच पण यातून कोणीही निराश होऊ नये किंवा अतिउत्साही होऊ नये खेळाचे पावित्र्य राखावे असे प्रतिपादन यावेळी बोलताणा राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर उपाध्यक्षा मिणा भद्रे यांनी केले आहे . स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रज्ञा संघ सदस्य परिश्रम घेत आहेत .

# संत कबीर विद्यालयात सावित्रीबाई फुले व माधवराव बोरडे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथे संत कबीर शिक्षण प्रसारक मंडळाचे कालकथित अध्यक्ष आदरणीय माधवराव बोरडे साहेब यांना प्रथम स्मृतीदिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले व कालकथित माधवराव बोरडे साहेब यांच्या आठवणीना "मी अनुभवलेले दादा" या विषयातून उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक आदरणीय श्री पवार.एस.बी यांच्या शुभहस्ते व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आदरणीय श्री म्हस्के आर.जी व श्रीमती कुलकर्णी एल.एम यांच्या उपस्थितीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आदरणीय श्री गव्हाणे व्ही.टी यांनी सूत्रसंचलानातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्राची व कार्याची माहिती दिली.

आजच्या दिवसाचे औचित्य साधून रोहिणी मागासवर्गीय मुलींचे वसतिगृहच्या संचालिका आदरणीय सुजाता माधवराव बोरडे मॅडम यांनी स्त्री मुक्ती दिनानिमित्त सर्व महिला शिक्षिकांचे बुके व गुलाबाचे फुल देऊन स्वागत केले. बालिका दिनानिमित्त शाळेतील सर्व विद्यार्थींनीना चॉकलेट चे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती कावले जे.डी यांनी केले.

# राज्य ऑलिंपिक स्पर्धेसाठी हॉकी संघ जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेच्या वतीने ५ ते ८ जानेवारी दरम्यान पुणे बालेवाडी येथे मिनी ऑलम्पिक स्पर्धा अंतर्गत हॉकी स्पर्धेचं आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेकरिता औरंगाबाद जिल्ह्याच्या संघाची घोषणा संघटनेचे सचिव पंकज भारसाखळे यांनी केली. हॉकी महाराष्ट्रच्या सहकार्याने आयोजीत या स्पर्धेमध्ये राज्यभरातून सर्वोत्तम ८ पुरुष व महिला संघ सहभागी होत असून औरंगाबाद संघास या मध्ये पात्रता मिळाली आहे. मुलींच्या संघाच्या कर्णधारपदी आचल सिरसागर तर मुलांच्या संघाच्या कर्णधारपदी इमरान शेख यांची निवड करण्यात आली आलेली असून निवडण्यात आलेल्या औरंगाबाद जिल्ह्याचा संघ पुढीलप्रमाणे आहे. (महिला संघ): आचल शिरसागर, निर्जला शिंदे, भाग्यश्री शिंदे, शालिनी साकुरे, दिपाली आगासे, निशा भोयर, कीर्ती ढेपे, अनिता शर्मा, पूनम वाणी, श्रुती विधाते, गौरी मुखाने, नाजूका मोहिते, अक्षदा सूर्यवंशी, अर्चिता सूर्यवंशी, भाग्यश्री वराडे, प्रियंका वाहूळ, विशाखा साळवे, प्रतिमा शेट्टी. संघ प्रशिक्षक- किशोर परदेशी व व्यवस्थापक- संजय तोतावाद. (पुरुष संघ): रिजवान शेख, अथर्व वाघमारे, इमरान शेख, पवन मंडोरे, जाहीर शेख, कलीम शेख, दीपक



बन्सीवाल, रिजवान शेख, नीरज शिरसाठ, समीर शेख, पवन ढाकणे, अकबर खान, प्रकाश दरेकर, प्रथमेश पाटील, शुभम आहेर, फादर शेख, देव तुर्की, अक्रम खान. संघ प्रशिक्षक- जाकिर यार खान व व्यवस्थापक- तोसीब मिर्झा. या सर्व खेळाडूंना हॉकी संघटनेचे अध्यक्ष मा.आ.श्रीकांत जोशी, उपाध्यक्ष अशोक साय्यना, दिनेश गंगवाल, सहसचिव श्यामसुंदर भालेराव, आजम शेख यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



## सावळदबारा जि.प. शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत क्रांतीज्योती व शिक्षण महर्षी आदरणीय सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम एम.डी. सोनवणे मुख्याध्यापक यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

पहिला महिला शिक्षिका व पहिली मराठी मुलींची शाळा निर्माण करणाऱ्या क्रांतीज्योती ह्या पहिल्या महिला शिक्षका होत्या. त्याचे परिणाम आज आपण बघतोय प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांचा वाटा हा 50 टक्के नसून जवळपास 70 टक्के वर येऊन पोहोचलाय याचा अर्थ क्रांतीज्योती यांना वाहिलेले हे खरे अभिवादन होईल आज जगाच्या पाठीवर प्रत्येक क्षेत्रामध्ये राजकीय सामाजिक आर्थिक व इतर कोणत्याही ठिकाणी महिला अग्रस्थानी आहे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक एम.डी.सोनवणे यांनी केले. यावेळी स्वातीताई भाऊराव पाटील सरपंच, मो.आरिफ मो.लुखमान उपसरपंच, शाळेय समितीचे अध्यक्ष सुपडा तडवी,शिक्षक भागवत गायकवाड, सतीश ढोणे,गवई सर, निता हिरास मॅडम शाळेतील सर्व शिक्षकबंधु इत्यादी उपस्थित होते याबद्दल सविस्तर माहिती प्रा. जीवन कोलते (सामाजिक कार्यकर्ते)यांनी बोलताना दिली.

# फत्तेपूर येथे चोरट्यांनी दोन दुकाने फोडली; सीसीटीव्हीत चोरटे कैद

आधुनिक केसरी न्यूज




**जामनेर :** तालुक्यातील फत्तेपूर येथील तंटामुक्तीचे अध्यक्ष यांचे भंसाली किराणा दुकान व शालीमार दारूचे दुकान दि. २/१/२३ जानेवारीच्या रात्री चोरट्यांनी किराणा फोडले. किराणा दुकानाच्या शटरचा सेंट्रल लॉक तुटला नाही. म्हणून या दुकानातून चोरट्यांना काही चोरता आले नाही. मात्र किराणा दुकानाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोघं चोरटे कैद झालेले आहेत. त्यानंतर काही अंतरावर असलेले शालिमार या दारूच्या दुकानाचा दरवाजा तोडून चोरट्यांनी मुद्देमाल लंपास केला.
येथील तंटामुक्तीचे अध्यक्ष बबलु भंसाली यांचे लहान भाऊ सुबोध भंसाली यांचे भंसाली किराणा दुकान बस स्थानकांवर मुख्य चौकात आहे. दि. २ रोजी रात्री या दुकानांच्या शर्टरचे दोघं कुलूपे चोरट्यांनी तोडले मात्र शटरचा मध्यभागी असणारा सेंट्रल लॉक चोरटे तोडू शकले नाहीत. या दुकानावर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोघे संशयीत चोरट्यांचे छायाचित्र कैद झाले आहे. तसेच चोरट्यांच्या हालचाली कैद झालेल्या आहेत. या फुटेजवरून पोलीस चोरट्यांचा शोध लावतील, याकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या आहेत किराणा दुकान फोडण्यास चोरटे अयशस्वी झाले त्यानंतर त्यांचा मोर्चा बसस्थानक परिसरात असणाऱ्या श्रीनिवास गौड (आण्णा) यांच्या शालीमार बियरबार या दारुच्या दुकानाकडे वळला. या दारूच्या दुकानाचा उत्तरेकडील दरवाजा चोरट्यांनी तोडून आत प्रवेश केला. दारूच्या दुकानातून चोरट्यांनी पंधरा हजाराचा ऐवज रोख, चार दारूचे मोठे बंपर, दोन क्वार्टर, दोन हजार रुपये किंमतीचे सिंगारेट पॉकीट व दारूच्या दुकानात लावलेल्या सीसी टीव्ही कॅमेऱ्याचे चित्रीकरण ज्या मशीनमध्ये जमा होते तेच सिस्टमचे मशीन चोरट्यांनी चोरून नेलेले आहे.
या घटनेमुळे व्यापारी वर्गात भितीचे व दहशतीचे वातावरण असून या अगोदर ही दुकाने फोडण्याचे अनेक प्रकार झालेले आहेत. भंसाली किराणा दुकान तर तिसऱ्यांदा फोडले गेले. चोरीच्या घटनेची माहिती येथील पोलीसांना दिली असून त्यांना सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेजही दिलेले आहेत. आता तरी पोलीसांनी चोरीचा तपास लावावा, अशी मागणी तंटामुक्तीचे अध्यक्ष बबलु भंसाली व शालीमार बियरबारचे मालक श्रीनिवास गौड यांनी केलेली आहे.

# पालकमंत्री संदीपान भुमरे यांचा कन्नड-सोयगाव विधानसभा दौरा



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** पालकमंत्री संदीपान भुमरे यांचा कन्नड सोयगाव विधानसभा मतदार संघात दौरा झाला या दौरा निमित्त पाणपोई फाटा येथे गोकुळ शेठ राजपूत मित्र मंडळ यांच्या वतीने पालकमंत्री संदिपानजी भुमरे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन तथा माजी आमदार नितीन पाटील, जिल्हाप्रमुख भरत राजपूत, जिल्हाप्रमुख रमेश पवार, कन्नड तालुका प्रमुख केतन काजे, जिल्हा बँकेचे संचालक डॉक्टर मनोज राठोड, नंदलाल काळे संचालक मुंबई दूध संघ, धनराज बेडवाल माजी सभापती जिल्हा परिषद, पांडुरंग घुगे माजी सरपंच तथा संचालक खरेदी विक्री संघ, हतनूरचे सरपंच कैलास अकोलकर, पंचायत समिती सदस्य किशोर पवार, उद्योजक नारायण बोडखे, भरत जाधव, नारायण जाधव, नंदू घोडके, यांच्यासह सर्व सर्व नवनीतनिर्वाचित सरपंच माजी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन तथा परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोलखेडा येथे सावित्रीबाई फुलेंना अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे जि.प.प्रार्थमिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.स्त्री जीवनाचा हुंकार आणि स्त्री शिक्षणाच्या शिल्पकार क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त जि.प.शाळेच्या वतीने मुख्याध्यापक आनंदा वारांगणे यांनी सावित्रीबाईना अभिवादन करण्यात आले. सावित्रीमाईंच्या जयंती दिनापासून सावित्रीबाई ते जिजाऊ उत्सव असे कार्यक्रम संपन्न होणार आहेत. आज पहिल्या दिवशी मोलखेडा गावापासून या कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमास सौ.मनिषाताई ज्ञानेश्वर वारांगणे,ग्रा.सदस्य अतुल इंगळे गावातील महिला उपस्थित होत्या. येथील महिलांनी निश्चय केला की आज पासून संपूर्ण महामानवांच्या जयंत्या साजऱ्या करण्याचा निर्णय झाला. यावेळी केंद्र प्रमुख श्रीमती एस.बी.राठोड,आनंदा वारांगणे मुख्याध्यापक, अवधूत सर,वाजुळगे सर, चौधरी सर, संदीप कळसकर व जि.प.शाळेचे शिक्षकवृंद,आदी महिला उपस्थित व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती महिला भगिनींच्या उपस्थितीत उत्साहात विठ्ठल चौक विठ्ठल नगर येथे साजरी करण्यात आली. यावेळी महिला आघाडीच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले महाविकास आघाडीचे व कम्युनिस्ट वंचित बहुजन आघाडीच्या वतीने साजरी करण्यात आली. महाविकास आघाडी कम्युनिस्ट पक्ष वंचित बहुजन आघाडीचे नेते कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महिला शिक्षणाच्या पहिल्या शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी त्या काळात महिलांना अंधश्रद्धेतून शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र झटत राहिल्याबद्दल व त्यांनी समाजात महिलांसाठी शैक्षणिक सामाजिक क्षेत्रात काम करत असताना समाजाच्या वतीने झालेल्या अतोनात छळ व अपमान कशा पद्धतीने सहन करत अखेर महिलांना चूल आणि मूल याच्या पलीकडे जाऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून त्यांच्या जीवनात शिक्षणाचे मुहूर्तमेढ रोवून आज खऱ्या अर्थाने महिला मोठ्या मोठ्या पदावर मुद्द्यावर राजकारणात समाजकारणात नोकरी व्यवसायात किती पुढे गेल्या आहेत. याबाबत विस्तृत असे मार्गदर्शन विविध पक्षाचे नेते यांनी सांगितले. राहुल सावंत, भास्कर लहाने गंगाराम कापसे यांनी प्रकाश टाकला. यावेळी सुभाष पाटील पांडभरे, वल्लभ शेठ भंडारी, विष्णू गुंठाळ, अरुण जाधव सुरेश हिवराळे संदीपबापू काळे, दीपक मस्के, दशरथ मानवतकर, अजय मस्के, अंकुश बडक, सुरेश शिराळे, अरुण जाधव, आनंद बनकर, माजी पोलीस अधिकारी श्रीमंत गायकवाड, इन्कम टॅक्स अधिकारी रोडगे, वार्ड अध्यक्ष ज्योती गीते, अनिता हिवाळे, गंगासागर लोखंडे, उज्वला मस्के, भगिरती मस्के, मिसाळताई शिवरायताई, जीवन मस्के, लक्ष्मण मुळे अंकल जाधव सर इत्यादींची उपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



## देवरे विद्यालयात नव वर्षारंभी आदर्श वर्ग रचना स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**नंदुरबार :** तालुक्यातील श्री. आप्पासो. आत्माराम धवळू देवरे माध्यमिक विद्यालय विखरण येथे प्रतीवर्ष परंपरेप्रमाणे नववर्षाच्या स्वागतारंभी आदर्श वर्ग रचना स्पर्धा आयोजित करण्यात आली. दोन गटांमध्ये इ.पाचवी ते सातवी व इ.आठवी ते दहावी या दोन गटात विविध मुद्द्यांच्या आधारे ज्यात विद्यार्थ्यांची उपस्थिती, स्वागत, सादरीकरण, बैठक व्यवस्था, मांडणी, विद्यार्थ्यांचे गणवेश, ओळखपत्र, वैयक्तिक स्वच्छता, टापटीपणा, वर्गस्वच्छता, शिस्त, वर्ग सजावटीतील तक्ते,चित्रे, स्वहस्तलिखीत भित्तिपत्रके,फलक लेखन, आरेखन तसेच विविध उपक्रम सामान्य ज्ञानावरील व पाठ्यक्रमावरील प्रश्नोत्तरे अशा विविध मुद्द्यांच्या आधारे स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.डॉ.डी.व्ही. सोनवणे, शेतीनिष्ठ सुजालपूर येथील अशोक पाटील,शेठ के.डी.विद्यालय तळोदा येथील नि.मुख्याध्यापक डी.सी. पाटील, जि.प. शाळा विखरणच्या जयश्री सैंदाणे यांच्या हस्ते सर्व वर्गांचे परीक्षण करण्यात आले. लहान गटातून इ.पाचवी वर्गाचे तर मोठ्या गटातून इ. दहावीचा वर्ग आदर्श वर्ग म्हणून निवडून घोषित करण्यात आला.

# परीक्षा विभागाच्या सावळ्या गोंधळामुळे पुष्पगुच्छ देऊन केले अनोखे अभिनंदन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** गेल्या कित्येक वर्षांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा परीक्षेतील गोंधळामुळे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचा सातत्याने सावळा गोंधळ समोर येत आहे. त्याचप्रमाणे यावर्षी हिवाळी 2022-23 च्या परीक्षांमध्ये तसाच गोंधळ दिसून आलेला आहे आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने परीक्षा विभागातील सातत्याने होणाऱ्या गोंधळामुळे परीक्षा नियंत्रक गणेश मांझा यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करत शुभेच्छारुपी आंदोलन केले. विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर विना हॉलतिकीट परीक्षेसाठी बसवण्यात आले आहे, विद्यार्थ्यांना हातावर पी.एन.आर नंबर लिहून दिलेला आहे, यावर्षीची परीक्षा फक्त पी.एन.आर नंबर वर होत असल्याचे दिसून येत आहे,काही विद्यार्थ्यांच्या हॉलतिकीट वर विद्यार्थिनींचा फोटो आहे. तर विद्यार्थिनींच्या हॉल तिकीट वर विद्यार्थ्यांचा फोटो आहे त्याचप्रमाणे बॅक लॉक व रेगुलर चा पेपर एकाच दिवशी होत आहे,दहा वाजता सुरू होणारा पेपर एक वाजता घेण्यात आलेला आहे अशा विविध समस्या



यंदाच्या परिक्षा होत असताना समोर आलेल्या आहेत. परीक्षा नियंत्रक यांचं विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे दुर्लक्ष झालेले दिसून येत आहे अभाविप चे प्रदेश सहमंत्री सूरज पवासे म्हणाले की, "परीक्षेच्या दरम्यान विद्यापिठाच्या विविध चुकांमुळे ज्या विद्यार्थ्यांचं शैक्षणिक नुकसान होईल त्यास विद्यापीठ जबाबदार असेल कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिले नाही पाहिजेत ज्यांचे नुकसान झाले आहे त्यावर उपाययोजना तात्काळ करावी अन्यथा अखिल भारतीय विद्यार्थी परिषद तीव्र आंदोलन करेल असे सांगीतले यावेळी महानगर मंत्री ऋषीकेश केकान, सहमंत्री अभिषेक गावडे,नगर मंत्री ओमकार देवरे चिन्मय महाले व विद्यार्थी मोठ्याप्रमाणावर उपस्थीत होते.



## लासूरला सरपंच चषक जे.के. मिर्झा फायटरने पटकावला

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन येथे आमदार प्रशांत बंब मित्रमंडळातर्फे टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या या चषकाला सरपंच चषक असे नाव देण्यात आलेले होते व 51 हजार रुपये रोख रक्कमेंसाह स्मृतिचिन्ह विजेत्या संघास देण्यात येणार होते काल झालेल्या सामन्यामध्ये सरपंच चषक .के. मिर्जा फायटरणे पटकवला विजेत्या संघास सरपंच मीनाताई संजय पांढव,नारायण वाकळे ग्रामपंचायत सदस्यं सिराजभाई मिर्जा, जे के मिर्जा,, संजय पांडव, धामोरीचे सरपंच रवी पाटील चव्हाण,छोटू पठाण,राजु पठाण, वाल्मिक दिवेकर यांच्या शुभहस्ते देण्यात आले.

## गरवारे बाल भवनमध्ये लहान बालकांसाठी धम्माल बाल खेळवाडी मोठया उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** गरवारे कम्युनिटी सेंटरचे गरवारे बाल भवन मध्ये सरत्या वर्षाला निरोप आणि नव वर्षाची सुरूवात हि बालवाडीतील बालकांसाठी बाल आनंद मेळाव्याने होत अस वय वर्ष ३ ते ६ या वयोगटातील मुलांसाठी दि. 30 डिसेंबर रोजी धम्माल बाल खेळवाडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकुण 350 बालकांनी सहभाग घेऊन विविध वेगवेगळ्या वैज्ञानिक, बुध्दिमता, सृजनशिलता यावर आधारित आणि मनोरंजनात्मक आकर्षक खेळ जसे की जंम्पींग मंकी, पाण्यातुन मासे काढणे, बादलीत बॉल टाकणे, बास्केटमध्ये बॉल टाकणे, चित्र रंगविणे, मातीपासून वस्तू बनविणे, पत्तांचा बंगला तयार करणे, पझल सोडवणे, मनोरा लावणे असे विविध १५-२० प्रकारचे आकर्षक खेळ हि छोटी चिमुकली मुले मनोसोक्त खेळली. विशेष म्हणजे यांचे हे खेळ घेणारेही ४ थी ते ९ वी चे बाल भवन मधील छंदवर्गाची मुले आणि गरवारे बाल भवन मधील महिला विभाग होत्या त्यामुळे त्यांना खुप मज्जा आली खेळ खेळुन झाल्यावर सर्वांना भरपूर बक्षिसेही देण्यात आली. या खेळवाडीचे उदघाटन बालसाहित्य लेखिका लीला शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी सेंटरचे संचालक सुनिल सुतवणे, रमाकांत रौताल्ले, शिल्पा अस्वलीकर आदी उपस्थित होते. दि. ३१ डिसेंबर जानेवारी २०२२ रोजी बालवाडीच्या मुलाचें सास्कृतिक कर्यक्रम सादर होणार आहे, असे सुनील सुतावणे यांनी सांगितले.






## नोटाबंदीविरोधात मोहीम उघडणाऱ्यांनी देशाची माफी मागावी : विश्वास पाठक



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नोटाबंदीची संपूर्ण प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवल्यानंतर सातत्याने देशात आणि परदेशात नोटाबंदीविरोधात मोहीम चालवणा-या राहुल गांधी, पृथ्वीराज चव्हाण,उद्धव ठाकरे व संजय राऊत यांनी देशाची माफी मागायला हवी अशी मागणी राज्य वीज कंपन्यांचे स्वतंत्र संचालक व भाजपा नेते विश्वास पाठक यांनी मंगळवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते, यावेळी प्रदेश उपाध्यक्ष बबनराव चौधरी, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये व प्रवक्ते गणेश हाके उपस्थित होते. पाठक म्हणाले की, ८ नोव्हेंबर २०१६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोटाबंदी घोषित केल्यानंतर प्रारंभी मनमोहन सिंग व कम्युनिस्ट नेत्यांनीही त्याचे स्वागत केले मात्र नंतर त्यांचे सूर अचानक विरोधी बनले. सर्वोच्च न्यायलयाने नोटाबंदीच्या निर्णयप्रक्रियेत कोणत्याही स्वरुपाच्या त्रुटी नसून तो निर्णय वैध ठरवला आहे. या निकालावरून स्पष्ट दिसते की श्री. मोदी हे बेजबाबदारपणे, घाईघाईत निर्णय घेत नाहीत. त्यांनी पूर्ण विचारांती व कायदेशीर प्रक्रीयेचे पालन करत नोटाबंदीचा निर्णय घेतला होता यावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. नोटाबंदीच्या निर्णयामुळे बनावट चलन, काळा पैसा, कर चोरीला आळा बसला, कॅशलेस व डिजिटल व्यवहार वाढले, दहशतवाद्यांचा निधीपुरवठा तोडला गेल्याने काश्मीरमध्ये होणारी दगडफेक थांबली आहे असे सांगून पाठक म्हणाले की, या निर्णयानंतर देशाची अर्थव्यवस्था ३ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढली आहे.

आता रिक्षावाला, चहावाला देखील डिजिटल व्यवहार करू लागला आहे.१२ लाख कोटींची उलाढाल डिजिटल व्यवहारातून होत आहे. अर्थसंकल्पाचा आकार १५ लाख कोटींवरून ४० लाख कोटींवर पोहोचला. त्यावेळी जगात ११ व्या स्थानावर असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेने आज ५ व्या क्रमांकावर उसळी मारली आहे. प्रत्यक्ष कर न वाढवता अर्थव्यवस्थेने ही लक्षणीय कामगीरी केली आहे, याचे श्रेय नोटाबंदीलाच द्यावे लागेल, असे पाठक यांनी स्पष्ट केले. नोटाबंदीचा निर्णय रिझर्व्ह बँकेशी सल्लामसलत करुनच घेण्यात आला होता असे घटनापीठाने नमूद केल्याकडे पाठक यांनी लक्ष वेधले.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# शिंदे-फडणवीस सरकारने महाराष्ट्रच विक्रीस काढला आहे का ?

## नाना पटोले : महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला दिल्यानंतर उरलेले उद्योग उत्तर प्रदेशला देण्याची तयारी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महावितरण कंपनीवर खाजगी कंपन्यांचा डोळा असून या कंपनीचे खाजगीकरण होऊ नये म्हणूनच राज्यातील वीज कंपन्यांचे कर्मचारी संपावर गेले आहेत.



महावितरण ही महत्वाची तसेच फायद्यात असलेली कंपनी अदानीसारख्या खाजगी उद्योगपतीच्या घशात घालण्याचा शिंदे-फडणवीस सरकारचा डाव आहे. महावितरणचे खाजगीकरण सुलभ व्हावे यासाठीच अंबानी-अदानीच्या मुलांची राज्याच्या आर्थिक सल्लागार मंडळावर निवड केल्याचे दिसत असून शिंदे-फडणवीस सरकारने महाराष्ट्रच विक्रीस काढला आहे का ? असा संतप्त सवाल महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी विचारला आहे. यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, महावितरणच्या खाजगीकरणला विरोध करत कर्मचारी, अधिकारी व अभियंते यांनी तीन दिवसांचा पुकारलेला संप सरकारला टाळता आला असता, दोन महिन्यांपासून कर्मचारी संघटना मागणी करत होत्या पण सरकारने त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. आता संप सुरु झाला आणि महाराष्ट्र अंधारात बुडाल्यानंतर सरकार चर्चेचे नाटक करत आहे. आधीच चर्चा केली असती तर महाराष्ट्रातील जनतेचे हाल झाले नसते. शहरी भागातील वीज वितरण ताब्यात घेऊन खाजगी कंपनी नफेखोरी करणार तर ग्रामीण भागात सामान्य जनता व शेतकरी यांना मिळणारी सवलतीच्या दरातील वीज मिळणे बंद होणार, महागडी वीज शेतकरी व ग्रामीण जनतेला परवडणारी नाही. पण भाजपा सरकारला जनतेचे देणेघेणे नाही. देश विकून देश चालवणारे भाजपा सरकार आता महाराष्ट्र विकण्यास निघाला आहे. देशातील सर्वात महत्वाचे असलेले मुंबई विमानतळ व आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानीच्या घशात घातला असून आता महावितरणही अदानीच्याच घशात घालण्याचा हा डाव आहे. वीज कर्मचाऱ्यांचा हा संप त्यांनी पगारवाढ किंवा त्यांच्या फायद्यासाठी केलेला नाही तर सामान्य वीज ग्राहकांना भविष्यात त्रास होऊ नये म्हणून केला आहे आणि आमचा त्यांना पाठिंबा आहे. शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासून दिल्लीच्या इशाऱ्यावर महाराष्ट्राचे महत्व कमी केले जात आहे. वेदांता-फॉक्सकॉन हा १.५४ लाख कोटी रुपयांच्या प्रकल्पासह इतर महत्वाचे प्रकल्प गुजरातला भेट देऊन महाराष्ट्राचे मोठे आर्थिक नुकसान केले, लाखो तरुणांचे रोजगारही गेले. उत्तर प्रदेशात गुंतवणूक वाढावी यासाठी ४ व ५ जानेवारीला योगी आदित्यनाथ हे मुंबईत येत असून उद्योगपती, चित्रपटसृष्टीतील महत्वाच्या लोकांशी ते चर्चा करणार आहेत. आता उरलेले उद्योग उत्तर प्रदेशच्या घशात घालण्यासाठी खोके सरकारने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासाठी पायघड्या घातल्या आहेत. भारतीय जनता पक्षाचा हा कुटील हेतू जनतेने लक्षात घ्यावा, असे आवाहनही नाना पटोले यांनी केले आहे.



# सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील माळी गल्लीतील संत श्रेष्ठ सावता महाराज मंदिरात दौलताबाद ते शिर्डी पायी दिंडीत प्रति साईबाबा म्हणून सहभागी झालेले धोंडीरामसिंह राजपूत यांनी मंदिरात येऊन संत सावता महाराज भक्तगण सोबत मंगळवार रोजी जयंती निमित्त स्त्री उन्नतीच्या आधारवड, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जोतिबा व सावित्रीबाई फुले यांनाअभिवादन केले. याप्रसंगी माळी समाजाच्या जेष्ठ समाज सेविका सुमनबाई गायकवाड, से.नि. फौजी गौतम गायकवाड, श्रीमती गायकवाड व ईतर सावता भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावित्रीबाईंची वेशभूषा, प्रश्नमंजूषा स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** तीन जानेवारी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंची वेशभूषा धारण केली. तसेच जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन जळगाव तालुक्यातील कंडारी येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत करण्यात आले. दीपाली सोनवणे व पूर्वी भिल्ल यांच्यासह इतर विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंची वेशभूषा धारण केली होती. त्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष लताबाई मोरे, मुख्याध्यापक संतोष वानखेडे, रमेश सूर्यवंशी, मंजुषा पाठक, सुनंदा रोझतकर, साधना सूर्यराव, सविता निंभोरे, विनोद जयकर,



डॉ.जगदीश पाटील आदींची उपस्थिती होती. त्यानंतर सावित्रीबाई फुले योजनेचा धनादेश मुलीला देण्यात आला. त्यानंतर डॉ. जगदीश पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित प्रश्नमंजुषा स्पर्धेत सुमारे साठ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शिष्यवृत्ती परीक्षेसारखी चार पर्यायी प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना देण्यात आली. प्रश्नमंजुषा स्पर्धेतील प्रश्नांची उत्तरे नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांना अर्ध्या तासाचा वेळ देण्यात आला. या स्पर्धेत इयत्ता चौथी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येक वर्गातून प्रथम, द्वितीय व तृतीय अशी तीन बक्षिसे काढण्यात येणार असून त्यांना प्रजासत्ताकदिनी आयोजित समारंभात ती बक्षीसे प्रदान करण्यात येणार आहे. दुपारच्या सत्रात सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर आधारित लघुपट दाखवण्यात आला. प्रोजेक्टरद्वारे सातवीच्या वर्गात दाखवण्यात आलेल्या या लघुपटाचा लाभ इयत्ता चौथी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी घेतला.

# डोणगावकर महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर उच्च माध्यमिक विद्यालय रांजणगाव पोळ येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रतिभा नितनवरे या होत्या तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून मुख्याध्यापक सुधाकर थोरात, संगणक शिक्षिका शिवकन्या कुकलारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी विद्यार्थीनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे वेशभूषा परिधान करून शाळेत आल्या होत्या.अनेक विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याविषयी विचार मांडले. यावेळी प्रा. प्रतिभा नितनवरे व संगणक शिक्षिका शिवकन्या कुकलारे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विषयी सखोल मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन कु ऋतुजा कु-हाडे तर आभार प्रणिता कु-हाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.






# युगऋषी पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या पुस्तकांच्या प्रदर्शनाचे ७ ते २२ जानेवारीला आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अखिल विश्व गायत्री परिवारतर्फे विचारक्रांती अभियानांतर्गत सेवा शांतिकुंज हरिद्वारचे युगऋषी पंडित श्रीराम शर्मा आचार्य (१९११ ते १९९०) यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात येत आहे. ७ ते २२ जानेवारी २०२३ या कालावधीत बाजीराव रस्त्यावरील आचार्य अत्रे सभागृहात सकाळी ९ ते रात्री ९.३० या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले असणार आहे, अशी माहिती गायत्री परिवारचे राजेश टेकरीवाल, हेमंत जोगळेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी हरिद्वार येथील प्रा. विश्वप्रकाश त्रिपाठी, गायत्री परिवाराच्या प्रतिभा मुळे, विनोद पटेल, पद्माकर लांजेवार आदी उपस्थित होते. राजेश टेकरीवाल म्हणाले, "आचार्यांनी गायत्री मंत्राच्या साधनेद्वारे माणसाचे परिवर्तन घडवून यावे, त्याची प्रतिभा जागृत व्हावी, चांगले विचार व चांगल्या कर्माकडे माणसाचा प्रवास होत रहावा, त्यातून कुटुंब, समाज व राष्ट्र देखील सकारात्मक ऊर्जेने भरून जावे व विश्वातील सर्व घटकांनी भेदाभेद विसरून, एकत्र येऊन आपले कल्याण करून घ्यावे, या उद्देशाने जन्मभरात सुमारे ३२०० पुस्तकांचे लेखन केले.जीवनातील प्रत्येक समस्येवर उपाय सांगणारी ही पुस्तके आहेत. आत्मबल, मनोबल वाढवून तणावातून मार्ग कसा काढावा, याविषयी ही पुस्तके मार्गदर्शनपर आहेत. सामाजिक काम करणाऱ्यांनाही ती उपयुक्त आहेत. हा सर्व द्न्यानाचा खजिना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विचारक्रांती अभियानाच्या माध्यमातून या पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. अतिशय सवलतीच्या दरात ही पुस्तके वाचकांना उपलब्ध होणार आहेत. हेमंत जोगळेकर म्हणाले, "आचार्यजींनी आपल्या लेखनातून मानवी समाजापुढे 'मानवात देवत्वाचा उदय व पृथ्वीवर स्वर्गाचे अवतरण' हेच ध्येय ठेवले आहे. देह ठेवण्याआधी सुमारे पाच वर्षे त्यांनी क्रांतिधर्मी साहित्य या नावाने विशेष पुस्तके लिहिली. त्याद्वारे येणाऱ्या नवीन युगासाठी त्यांनी मानवतेला उज्ज्वल भविष्याचा मार्ग दाखवला आहे. युगऋषी पंडित श्रीराम शर्मा यांच्या पुस्तक प्रदर्शनाचे हे पाचवे वर्ष आहे. युगऋषी यांनी आपल्या ८० वर्षांच्या तपस्वी जीवनात ३२०० पेक्षा अधिक पुस्तके लिहिली आहेत.

